# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २७/११/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २७/११/२०१३ रोजी सभा सुचना क्र. १८ दि. २१/११/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजु यशवंत भोईर | सभापती |
| २. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ४. | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| ५. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ६. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ७. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ८. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ९. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| १०. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ११. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| १२. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १३. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| १४. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| १५. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग तसेच नविन सदस्यांचे हार्दिक स्वागत. सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २७/११/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १८, दि. २१/११/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र, १२०, दि. २६/०९/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**अनिता पाटील :-**

दि. २६/०९/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शर्मिला बगाजी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२० :-**

दि. २६/०९/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १०९ :-**

दि. २६/०९/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. अनिता पाटील** **अनुमोदन :- श्रीम. शर्मिला बगाजी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२१, भाईंदर (पूर्व) मौजे खारी आ.क्र. १०९ (खेळाचे मैदान) या जागेत वाचनालय बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रभात पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास योजने नुसार आ.क्र १०९ “खेळाचे मैदान” या प्रयोजनाकरीता आरक्षित आहे. मंजुर विकास योजना अहवालानुसार आरक्षणाचे क्षेत्र १०,४००.०० चौ.मी आहे. सदर क्षेत्रफळापैकी ८७४०.५० चौ.मी या महानगरपालिकेस हस्तांतरित झालेल्या क्षेत्रावर महानगरपालिकेने संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये नकाशे मंजुर केले आहेत.

सदरचे नकाशे चेंजिंग रुम, वाचनालय व हॉल या प्रयोजनाकरीता मंजुर करण्यात आले आहे. मे. आर्किझम यांनी सदर कामाचे अन्वये अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर अंदाजपत्रकानुसार विषयांकीत जागेतील इमारतीच्या बांधकामास लागणारे एकुण अंदाजपत्रकीय शुल्क रु.१९०.०५ लक्ष याप्रमाणे आहे.

मंजुर नकाशातील बांधकाम करणेबाबत मा. नगरसेवक श्री. दिनेश दगडु नलावडे यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतुन रु.१०.०० लक्ष चा वापर करणेस दि.२८/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये अनुमती दिली आहे. तसेच मा. श्री. राजेश शंकर वेतोसकर, नगरसेवक यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतुन रु.१०.०० लक्ष चा वापर करणेस दि.२८/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये व त्यांच्य प्रभाग समिती निधीतुन रु.१५.०० लक्ष चा वापर करणेस दि.०४/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये अनुमती दिली आहे. याप्रमाणे विषयांकीत जागेतील इमातीचे बांधकाम करणेकामी सद्यस्थितीत एकुण रु. ३५,००,०००/- चा निधी उपलब्ध होत आहे.

मा. श्री. दिनेश नलावडे, नगरसेवक यांचा नगरसेवक निधी (१०.०० लक्ष) व मा. श्री. राजेश वेतोस्कर, नगरसेवक यांचा नगरसेवक निधी (१०.०० लक्ष) व प्रभाग समिती निधी (१५.०० लक्ष) यांतुन उपलब्ध एकुण निधी शुल्क रु.३५.०० लक्ष याप्रमाणे असल्याने सदर निधी अंतर्गत विषयांकीत जागेतील इमारतीचे भागशः स्वरुपात अंदाजपत्रक तयार करणे करीता मे. आर्किझम यांस महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले होते. तद्अनुषंगाने मे. आर्किझम यांनी उपलब्ध निधी रु. ३५.०० लक्ष च्या मर्यादेत अंदापत्रक तयार केले आहेत. सदर अंदापत्रकानुसार मंजुर नकाशातील तळ मजल्यातील जिमखाना क्षेत्र व त्या लगतचे पॅसेजच्या क्षेत्राचे बांधकाम करता येऊ शकेल.

सबब सदर प्रकरणी आरक्षण क्र.१०९ (खेळाचे मैदान) या जागेतील मंजुर बांधकाम नकाशानुसार तळमजल्याचे भागशः बांधकाम नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत करण्यास (जिमखाना क्षेत्र व त्या लगतचे पॅसेजचे क्षेत्र) रु. ३५.०० लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. प्रभाग समिती अंतर्गत निधीची संबधित प्रभाग समितीची मान्यता घेण्यात यावी.

**अनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, इसमे २-३ बात का खुलासा चाहीए। क्या यह आरक्षण क्र. १०९ सीआरझेड बाधित है या नही? दुसरी बात खेल के मैदान का आरक्षण है इसके अंदर अभी हम वाचनालय के लिए परमिशन लेने की कोशिश कर रहे है और मिरा भाईंदर नगरपालिका मे इतना बडा पॉप्यूलेशन बढ गया। हम हर बुक मे लिख रहे है की इतना पॉप्युलेशन बढ रहा है पर बेसिक खेल के मैदान की सुविधा कही भी डेव्हलप नही किया गया। वाचनालय जिनका प्रायव्हेट बेसिस बहोत उपलब्ध है अगर हमे खर्चा ही करना है और खेल के मैदान का आरक्षण का जो बेसिस है उसको वाचनालय बनाके उसको डिफिट कर रहे है जो भी खर्चे से अगर छोटासा भी फुटबॉल ग्राऊंड बन सकता है क्रिकेट ग्राऊंड बन सकता है वह अति उत्तम रहेगा। हम बेसिक आरक्षण परपज को डिफिट कर रहे है। तिसरी बात इसमे लिखा गया है की मे. आर्किझम कंन्सलटंट को यह काम दिया गया। जिसमे १ करोड ९० लाख का इस्टीमेट तयार किया गया। १ करोड ९० लाख का इस्टीमेट अभी तयार किया था या १० साल पहले तयार किया था? दुसरी बात आर्किझम कंन्सलटंट को किस ऑथोरीटी से काम करने का अधिकार दिया था? उसके कागजपत्र चाहीए और आर्किझम कंन्सलटंट को इसकी जो फिज दी जाएगी वह कितना परसेंट है कितना है? और वह अभी के हिसाब से दि जाएगी या १ करोड ९० लाख के हिसाब से दि जाएगी या आनेवाले समय मे जो प्लॅन बन जायेगा या उसकी कॉस्ट से दि जाएगी? इन सब बातो का दस्तावेज सहीत कृपया करके क्लीअर करनेकी कोशिश करीए।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, डॉक्टर साहेबांनी एवढं सगळं बोलले त्याच्यातलं आणखीन एक खुलासा करुन द्या. एकतर आपली प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी तर नगरसेवक निधी आपल्या स्टँडींग मध्ये येते ठिक आहे पण प्रभाग निधी ही प्रभाग समिती कडुन मंजुर होऊन नंतर इथे येते तर त्याचा सुध्दा खुलासा करा. कारण प्रत्येक

वेळेला हेच होते जेव्हा प्रोजेक्ट असतो करोडो रुपयात त्याच्यात आपण थोडी नगरसेवक निधी वापरु तर पुढच्या पैशांच काय? मग ते कुठे कसे आणि कोणी वापरावे? आणि कसं त्याने तो प्रोजेक्ट पुर्ण करावं याचा सुध्दा खुलासा व्हायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आरक्षण क्र. १०९ हे क्रिडांगणाकरीता राखीव असून त्याचं एकुण क्षेत्र १०४०० आहे त्यापेकी जवळजवळ ९० टक्के क्षेत्र हे आपल्या ताब्यात आलेलं आहे आणि ह्या क्षेत्रामध्ये १५ टक्के आरक्षणामध्ये आपण बांधकाम करु शकतो त्याप्रमाणे इकडे हे काम इस्टीमेट केलेत आणि ह्याला १७/०४/२०१० रोजी तत्कालीन आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. त्यापैकी आपण फर्स्ट पार्ट मध्ये इस्टीमेट एकुण केलेला आहे १ कोटी ९० लाखाचं २०१३ ला हे इस्टीमेट आपण करुन घेतलेलं आहे आणि त्यापैकी फक्त आपण आता ३५ लाखाचं जे तरतुद आहे म्हणजे निधी उपलब्ध होणार आहे प्रमाणे आपण ते ३५ लाखाचचं बांधकाम करायचं इस्टीमेट केलेला आहे. फर्स्ट पार्ट मध्ये ह्याकरीता आपले आर्किटेक गिरीश प्रधान आहे त्यांना आपण २००२ सालापासुन नेमलेलं आहे. काही कामांकरीता जो काही विशिष्ट इमारतींची कामं असतात त्याकरीता आपण त्यांना नेमलेलं आहे आणि वेळोवेळी त्यांना स्थायी समितीची मुदतवाढ घेतलेली आहे आणि त्यांचा जो रेट आहे इस्टीमेट चं त्यांनी केलं तर त्यांना २८ टक्के आपल्याला रक्कम द्यायची आहे आणि ह्या केस मध्ये त्यांना आपण फक्त ३५ लाखाचं इस्टीमेट केलं आहे ह्याच्यावरतीच २ टक्के आपण पैसे देणार आहोत आणि हे जे इस्टीमेट आहे एकत्र आहे म्हणुन स्टँडींग पुढे आणलं बाकी आता स्टँडींग मध्ये मंजुंर झालं की, जे १५ लाखाचं प्रभाग समिती निधी आहे त्या प्रभाग समिती करीता मंजुरी करिता आज ते पाठवून देवू १५ लाखाचं तीन पार्ट मध्ये.......

**शरद पाटील :-**

तसं करु शकतो का आपण? स्टँडींग मध्ये मंजुरी घेतल्यानंतर परत प्रभाग समिती मध्ये पाठवणार असं उलट होऊ शकत का?

**दिपक खांबित :-**

इस्टीमेट एकत्र आहे ना.

**शरद पाटील :-**

ठिक आहे तरीपण इस्टीमेट एकत्र असंल तरी आपल्या सोयीनुसार करणार का आपण की, नियमानुसार करणार?

**दिपक खांबित :-**

नियमानुसार आहे.

**शरद पाटील :-**

कसं काय नियमानुसार आहे तुम्ही स्थायी समितीमधुन मंजुरी घेऊन परत प्रभाग समितीमध्ये पाठवणार हे नियमानुसार आहे का?

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीमध्ये आम्ही ठेवलं होतं एकुण ३५ लाखाला इस्टीमेटला मंजुरी दिलेली आहे त्यापेकी १५ लाख रुपये प्रभागाची निधी घ्यायची आहे.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे तेच आम्ही विचारतो प्रभाग निधी तुम्ही घेता तर प्रभाग समिती मधुन मंजुर होऊन यायला पाहिजे ना ती आली का?

**दिपक खांबित :-**

नाही आली आता पाठवणार.

**शरद पाटील :-**

असं कसं उलट होऊ शकते?

**रोहिदास पाटील :-**

आपला वाचनालयाचा हेड आहे ना? आपला हेड राखीव आहे ह्या हेडसाठी...............

**शरद पाटील :-**

हे सगळं बांधण्यामध्ये कुठेही आमचा विरोध नाही पण नियमामध्ये जे आहे ते चालायला पाहिजे आज ही कोर्टामध्ये ज्या केसेस चालू आहे त्या आपण नियमानुसार न करणं गरज नसल्यामुळे चालू असल्यामुळे त्याचा भुर्दंड हा सदस्यांना भोगावा लागतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो ३५ लाखाचं आहे म्हणुन स्टँडींग मध्ये............

**शरद पाटील :-**

साहेब, नियम आहे की नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

आहे ना.

**शरद पाटील :-**

मग तुम्ही नियमाने आणा ना जर उद्या ह्याच्यावर उद्या कुठची पण कारवाई झाली त्याला जबाबदार तुम्ही का आम्ही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

आम्ही प्रोसिजर मध्ये लिहतो ना.

**शरद पाटील :-**

त्याची जबाबदारी कोण घेतं?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

स्टँडींग मध्ये मंजुर झाल्यानंतर प्रभाग समिती मंजुर करेल प्रभाग समितीमध्ये मंजुर झाला तरचं काम होईल नाही मंजुरी दिली तर नाही होणार.

**शरद पाटील :-**

मंजुर झाल्यानंतरच तुम्ही करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

३५ लाखाचा विषय आहे म्हणुन आणला आहे.

**शरद पाटील :-**

हो बरोबर आहे ना. सगळं मान्य आहे कितीचाही तो विषय असु दे पाच रुपयांचा असु द्या ना आर्थिक बाबींचा जिथे विषय येतो तिथे तुम्ही नियमानुसार चाला ना. आमचा कुठेही करायला विरोध नाही कुठे ही त्यांचा विरोध नाही की नगरसेवक निधी प्रभाग निधी वापरु नये असं.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

स्टँडींगची मंजुरी घेतल्यानंतर प्रभाग समितीची मंजुरी घेणार. प्रभाग समितीची मंजुरी झाल्यानंतर इम्प्लीमेंट करणार.

**शरद पाटील :-**

साहेब हे नियमात बसते की नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

बसते.

**शरद पाटील :-**

हे नियमात आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

हो नियमात आहे.

**शरद पाटील :-**

याची जबाबदारी तुमची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

हो आमची जबाबदारी आहे.

**दिपक खांबित :-**

सी आरझेड मध्ये नाही.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय ते म्हणतात ना नियमात बसतं आयुक्त महोदय मग तुम्ही प्रभाग समितीची मंजुरी घेतल्यानंतर ते करावं त्या प्रोसिडींगमध्ये तसं म्हणा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

३५ लाखाचा विषय असल्यामुळे आपण इथे आणलेला आहे इकडे मंजुर झाल्यानंतर तिकडे घेणार.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

खांबित साहेब ने स्विकार किया की सीआरझेड मे नही है ॲग्री दुसरा ॲडमिनीस्ट्रेशन और सत्ता पक्ष यह मानने को तयार है की इन्हे खेल के मैदान की जगह पर वाचनालय के लिए ज्यादा जरुरत है।

**दिपक खांबित :-**

१५ टक्के मे।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

बराबर है। १५ टक्का है लेकीन जो ८५ टक्का का काम है निधी मे वह काम पहले करना चाहिए। हम लोग यही बोल रहे है की, निधी के हिसाब से खेल के मैदान मे जो खर्चा कर रहे है वह पहले खेल के लिए ग्राऊंड मिल जाए उतनी सुविधा करो वाचनालय वगैरा जिमे वगैरा............

**दिपक खांबित :-**

उसके पिछे यह जो ग्राऊंड है ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब यह निधी का बात है इसमे आपको फरक नही आऐगा हमारा यह बोलने का है खेल को खेल के लिए विकसीत करो। यह हमारा मानना है नही तो इसपे हमारा विरोध है।

**दिपक खांबित :-**

यह जो १०९ प्ले ग्राऊंड है इसके पिछे १२२ सी बहुत बडा मैदान है इसके चार गुना बडा मैदान है। जहाँपर मट्टी भरके करके मैदान महानगरपालिका ने रेडी किया है इसको लगके हि है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उसका तयार है।

**दिपक खांबित :-**

हॉ तयार है।

**शरद पाटील :-**

किती आहे ती?

**दिपक खांबित :-**

वीस एक हजार आहे.

**शरद पाटील :-**

दहा हजार एरीयामधुन २५ टक्के घेतो.

**दिपक खांबित :-**

१५ टक्के घेतो.

**शरद पाटील :-**

८५ टक्के जे उरेल त्याच्यात तुम्ही खेळाचं मैदान बनवणार आहात का?

**दिपक खांबित :-**

कशामध्ये?

**शरद पाटील :-**

८५ टक्के उरते त्याच्यात तुम्ही खेळाचं मैदान बनवणार का?

**दिपक खांबित :-**

हो.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, यह जो मैदान बनाने का आप बोल रहे है तयार है तो पहले यह सुचना लाओ ना की, यहाँपर इतना तयार है उस सुचना पे जो हे वह मालुम पडेगा की इतना तयार है।

**रोहिदास पाटील :-**

दोन्ही आरक्षण अलग अलग असतील ना दोन्ही आरक्षण खेळाचे मैदान असतील.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

हम १०९ की बात कर रहे है।

**दिपक खांबित :-**

साहेब जेसल पार्क, नवघर डी पी रोड असतील ना तो पास होतो आणि त्याच्या पलिकडे.

**शरद पाटील :-**

ते आरक्षण कसलं आहे?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपने १०९ का दिया है खेलने के लिए।

**दिपक खांबित :-**

मैदानच आहे.

**शरद पाटील :-**

हे आरक्षण मैदानासाठी आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आज मिरा भाईंदर नगरपालिका को खेलका मैदान विकसीत करना चाहीए वाचनालय की इतनी जरुरत नही है।

**दिपक खांबित :-**

प्रशासन ने यह सब देखके लाया है की, वहाँपर दुसरा मैदान चार गुना मैदान अवेलेबल है।

**शरद पाटील :-**

ते बरोबर आहे चार गुना मैदान आहे म्हणजे शेवटला असंच परत परत इकडे तुम्ही हे केल्यानंतर परत तुम्ही तिथे करणार असं आमचं म्हणणं आहे पण तुम्ही हे जे ८५ टक्के उरलेले आहे तिथे खेळाचं मैदान बनवणार आहात की नाही ते सांगा.

**दिपक खांबित :-**

हो सर.

**शरद पाटील :-**

तुम्ही बाजुचं काय आहे ते सांगु नका इथे एक नाही ५० मैदान झाली तरी चालतील या मिरा भाईंदर शहराला.

**दिपक खांबित :-**

त्याकरीता आताच एक पत्र आलेलं आहे. प्रताप सरनाईक साहेबांनी त्यांचा १५ लाखाचा निधी आहे त्याच्यामध्ये मैदानाकरीता जे काही काम आहे त्याकरीता पैसा उपलब्ध करुन दिला.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, बजट मे जो लेखाशिर्ष देते है उसपे आप आरक्षण क्र. विकसीत करने के लिए बजट अलग से रखते है ना तो प्रभाग निधी का और इसपे ट्रान्सफर करनेका अपुन को हक है? किस कानुन के अंतर्गत बजट मे प्राविधान किया तरतुद किया वाचनालय विकसीत करने का, खेल का विकसित करने का उसकी बजट की तरतुद अलग से की हुई है अभी आप प्रभाग निधी शुरु करते हो।

**दिपक खांबित :-**

वाचनालय की जो तरतुद है उनमे से अलग अलग वाचनालय के काम किए ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

किए ना लेखा शिर्षक जो है उसके अंदर प्लॅनिंग किया हुआ है ना।

**दिपक खांबित :-**

प्रभाग समिती निधी जो है ना............

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उसपे कही लिखा हुआ नही है की, वाचनालय के लिए प्रभाग निधी युज किया जा सकता है।

**दिपक खांबित :-**

प्रभाग समिती निधी जो है उसका कोई भी जी आर नही है उसका खाली २९ जो सेक्शन है उसमे इतना ही लिखा है की, प्रभाग समिती और जो नगरसेवक है वह वॉर्ड के वहृ प्रभाग समिती नं. ३ है समझो ३ के क्षेत्र मे दो नगरसेवक कुछ भी जो विकास का काम है वह दे सकता है। वह कौनसा काम है वह स्पष्ट नही है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप यह मान रहे है की, बजेट के लेखाशिर्ष हेड के अंतर्गत अगर प्रोव्हीजन नही है फिर भी आप कही से भी उठाके डाल सकते है आप यह मान रहे है।

**दिपक खांबित :-**

प्रोव्हीजन नही है अभी प्रभाग अधिकारी निधी है समझो आप रोड का भी काम देते हो गटर का भी काम देते है लेकीन रोड गटर के लिए सेपरेट बजेट भी रहता है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

लेखाशिर्ष जो हो बजेट के अंदर उसमे इसके लिए प्रोव्हीजन नही किया या फिर भी आप पॉवर ले रहे है की आप प्रभाग निधी से पैसा उठाकर वहाँपर डाल सकते है।

**प्रभात पाटील :-**

लेखाशिर्ष तो अलग बात है उसमे प्रोव्हीजन होगा ही।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

वह है लेकीन अभी ये क्या कर रहे है उसका तो झीरो है सारासर पैसा प्रभाग निधी से आ रहा है ना। अभी ३५ लाख का ३५ लाख....................

**प्रभात पाटील :-**

प्रभाग निधी नगरसेवक के हक हा निधी है ना।

**दिपक खांबित :-**

मॅडम त्यांच काय म्हणणं आहे की, तुम्ही जे वाचनालय करीता पैसे ठेवलेले आहे तो तुम्ही का वापरत नाही? तो वाचनालय मे उस फंड ऑलरेडी दुसरे काम प्रपोज है ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

हम यह मान लेते है आप यह मान रहे है की, बजेट लेखाशिर्ष मे प्रोव्हीजन नही है फिर भी आप प्रभाग निधी ट्रान्सफर कर रहे है स्वविवेक से क्योकी प्रभाग निधी को जीआर नही है आपका यह कहना है अभी आर्किझम कंसलटंट को २००२ मे अपॉईंट किया था। स्टॅन्डर्ड निकला होगा या प्रोसेस किया होगा। उसके बाद मे उसको कितनी बार मुदतवाढ दी है?

**दिपक खांबित :-**

तीन बार २००५ मे दी, २००८ मे दी, २०१० मे दी।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

२०१० तक मुदतवाढ दी है।

**दिपक खांबित :-**

जो २०१० तक उनको काम दिए थे वही पुरे नही हो रहे है इसलिए उनको मुदतवाढ दे रहे है और २०१२ मे नया कंन्सलटंट अपॉइंट किया है और कामो के लिए।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मुझे बडा अजीब सा लग रहा है की, हम बॅक लॉग को परस्यु कर रहे है पुरी रेक्टो के साथ मे आर्किजम कंन्सलटंट के पुरे रेन्टो के साथ मे। मै यह बोलना चाहता है की, हमने किसीको इतना काम दे दिया की वो पुरा नही कर पा रहा है। २०१२ का नया कंन्सलटंट आ गया फिर भी हम २०१३ मे २०१० के दिए गये काम के आधार पर काम करवा रहे है।

**दिपक खांबित :-**

उसमे कुछ नुकसान नही है ना रेट सेम है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

नुकसान नही है लेकीन जब हम २०१२ के बाद के काम के लिए कंन्सलटंट नियुक्त किया तो २०१२ के बाद का काम उसीको पाना चाहीए।

**दिपक खांबित :-**

पर इन्होंने पहले ही प्लान एस्टीमेट बनाया है ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह तो बडी अजीब सी बात है जब आप काम ही नक्की कर लिए है की, यह काम करेंगे तो साल डिसाईड करने का क्या जरुरत है? इसका मतलब यह हुआ की आज के डेट मे आपका २०१२ के बाद राजु कंन्सलटंट भी काम कर रहे है और आर्किझम कंन्सलटंट भी काम कर रहे है।

**दिपक खांबित :-**

अलग अलग काम कर रहे है और हम लोग अभी ५-६ नये कंन्सलटंट और नये अपॉईंट कर रहे है अपने पॅनल पे।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उनकी आप टाईम के लिए अपॉईंट करते है या काम के लिए?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह तो आप बोल रहे है की काम पहले का दिया हुआ है इसलिए पहले का काम कर रहे है।

**दिपक खांबित :-**

टाईम पिरेड के लिए करते है ना जो अभी राज्य को किया है उनकी मुदत हे २०१४ तक अगर इसके बिच इनको कुछ काम दिए है। वह अगर २०१४ तक पुरे नही हुए तो उनको हम लोग मुदतवाढ देंगे ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

कृपया करके आपने जो कंन्सलटंट को लास्ट मे मुदतवाढ दिया है और जो बाकी काम दिए ये जो की पेंडींग लिस्ट थी। उसमे कौन कौन से काम बाकी है जो उन्हे करने का है? उसकी हमे लिस्ट दी जाए। साथ मे उनको सुपर व्हिजन का कितना पैसा है? एज्युकेशन का कितना पैसा है।

**दिपक खांबित :-**

सुपर व्हिजन का १ टक्का है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

१ टक्का है और?

**दिपक खांबित :-**

इस्टीमेट, ड्रॉईंग, डिझाईन का २ टक्का है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

ओके यह जो कॉस्ट है वह कॉस्ट १ करोड ९० लाख का बनाया था। तो जिन्होंने लिया होगा उस हिसाब से कर दिया होगा उस हिसाब से इस्टीमेट आया।

**दिपक खांबित :-**

नही ना जो इस्टीमेट सॅन्शन होता है वही पेमेंट करते है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अभीतक उनको एक भी पैसा पेमेंट नही किया है।

**दिपक खांबित :-**

नही।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अभी ३५ लॅक के हिसाब से करेंगे २ टक्के करेंगे की, ३ टक्के से करेंगे?

**दिपक खांबित :-**

२ टक्के और सुपर व्हीजन जैसे काम पुरा होगा वो टाईम पे १ टक्का करेंगे।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सर, कोई भी प्रोजेक्ट बनता है तब पीएमसी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंट आते है उनको बिट निकलती है और वह सुपर व्हाईज करते है हर का अपना अलग अलग रेट रहता है यहाँपर हमने निर्विवाद रुप से मोनोपॉली दे दी है एक कंन्सलटंट को उस ठराव से की, आप ही बनाऐंगे और आप ही इसको सुपरव्हाईज करेंगे। यानी के हमने दो अलग अलग पार्ट का एक मिस कर दिया और बिचमे हमने किसीको चान्स भी नही दिया है की, अलग से कंन्सलटंट बने और उसके अंदर बिड कर सके यह पॉईंट करना २००२ से लेकर आजतक हमने जो निधी फॉलो की, उसमे नई टेक्नीक आ रहे है, इस तरह से मुदतवाढ दे दे के बाकी लोगो को आने से रोक रहे है यह मेरा आरोप है।

**दिपक खांबित :-**

साहेब आपले जे कन्सलटंट आहे गिरीश प्रधान यह २००२ से नही है वह १९९८ से है और इनके ही कार्यक्रम मे यह जो बिल्डींग मे बैठे है यह बिल्डींग लेके काशिमिरा रोड, जितने भी स्कुल बने वह स्कुल, मिरारोड हॉस्पीटल .............

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मैने पहले ही बोला है ड्यू रिस्पेक्ट सारी बात करो और मे पॉलिसी मॅटर की बात कर रहा है।

**दिपक खांबित :-**

हा तो जो भी है वह प्रोसेस करके ही किया है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पर इतना लम्बा किसीको हम रख सकते है? जो जो निविदा आयी है २०१० के अंदर २००८-०९ के अंदर कितनी टेक्नीक चेंज हो गई है। कितने नये नये आर्किझम होंगे। हम किसीको चान्स नही देना चाहते?

**दिपक खांबित :-**

वो तो टेंडर निकालते है। हमने टेंडर निकाले थे।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप मुदतवाढ दे रहे है। इसका मतलब आप दुसरा चान्स देना नही चाहते।

**दिपक खांबित :-**

नही अभी हम लोग तो स्टँडींग मे सब्जेक्ट लाते है स्टँडींग बोलते है नही.............

**प्रभात पाटील :-**

पुढचा विषय घ्या.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२१ :-**

भाईंदर (पूर्व) मौजे खारी आ.क्र. १०९ (खेळाचे मैदान) या जागेत वाचनालय बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ११० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास योजने नुसार आ.क्र १०९ “खेळाचे मैदान” या प्रयोजनाकरीता आरक्षित आहे. मंजुर विकास योजना अहवालानुसार आरक्षणाचे क्षेत्र १०,४००.०० चौ.मी आहे. सदर क्षेत्रफळापैकी ८७४०.५० चौ.मी या महानगरपालिकेस हस्तांतरित झालेल्या क्षेत्रावर महानगरपालिकेने संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये नकाशे मंजुर केले आहेत.

सदरचे नकाशे चेंजिंग रुम, वाचनालय व हॉल या प्रयोजनाकरीता मंजुर करण्यात आले आहे. मे. आर्किझम यांनी सदर कामाचे अन्वये अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर अंदाजपत्रकानुसार विषयांकीत जागेतील इमारतीच्या बांधकामास लागणारे एकुण अंदाजपत्रकीय शुल्क रु.१९०.०५ लक्ष याप्रमाणे आहे.

मंजुर नकाशातील बांधकाम करणेबाबत मा. नगरसेवक श्री. दिनेश दगडु नलावडे यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतुन रु.१०.०० लक्ष चा वापर करणेस दि.२८/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये अनुमती दिली आहे. तसेच मा. श्री. राजेश शंकर वेतोसकर, नगरसेवक यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतुन रु.१०.०० लक्ष चा वापर करणेस दि.२८/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये व त्यांच्य प्रभाग समिती निधीतुन रु.१५.०० लक्ष चा वापर करणेस दि.०४/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये अनुमती दिली आहे. याप्रमाणे विषयांकीत जागेतील इमातीचे बांधकाम करणेकामी सद्यस्थितीत एकुण रु. ३५,००,०००/- चा निधी उपलब्ध होत आहे.

मा. श्री. दिनेश नलावडे, नगरसेवक यांचा नगरसेवक निधी (१०.०० लक्ष) व मा. श्री. राजेश वेतोस्कर, नगरसेवक यांचा नगरसेवक निधी (१०.०० लक्ष) व प्रभाग समिती निधी (१५.०० लक्ष) यांतुन उपलब्ध एकुण निधी शुल्क रु.३५.०० लक्ष याप्रमाणे असल्याने सदर निधी अंतर्गत विषयांकीत जागेतील इमारतीचे भागशः स्वरुपात अंदाजपत्रक तयार करणे करीता मे. आर्किझम यांस महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले होते. तद्‌अनुषंगाने मे. आर्किझम यांनी उपलब्ध निधी रु. ३५.०० लक्ष च्या मर्यादेत अंदापत्रक तयार केले आहेत. सदर अंदापत्रकानुसार मंजुर नकाशातील तळ मजल्यातील जिमखाना क्षेत्र व त्या लगतचे पॅसेजच्या क्षेत्राचे बांधकाम करता येऊ शकेल.

सबब सदर प्रकरणी आरक्षण क्र.१०९ (खेळाचे मैदान) या जागेतील मंजुर बांधकाम नकाशानुसार तळमजल्याचे भागशः बांधकाम नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत करण्यास (जिमखाना क्षेत्र व त्या लगतचे पॅसेजचे क्षेत्र) रु. ३५.०० लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. प्रभाग समिती अंतर्गत निधीची संबधित प्रभाग समितीची मान्यता घेण्यात यावी.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदन :- श्रीम. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२२, भाईंदर (पूर्व) फाटक रोडवरील फाटक (साईबाबा मंदिर) ते सब-वे पर्यंतचा रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे व नविन गटार बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रभात पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) फाटक रोड लगत फाटक (साईबाबा मंदिर) ते सब वे पर्यंतचा रस्ता हा अतिशय खराब झालेला असून पाणी पूरवठा विभागाच्या टँकर ची ये-जा होत असल्यामुळे सदरचा रस्ता हा नादुरूस्त झालेला आहे. त्यामुळे सदर रस्ता व रस्त्यालगत नविन गटार बनविणे आवश्यक आहे व तसेच तांत्रिकदृष्ट्या सदर कामाची आवश्यकता आहे. त्यानुसार सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) फाटक रोड वरील फाटक (साईबाबा) मंदिर ते सब वे पर्यंतचा रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे व नविन गटार बनविणे. | रु.४१,८८,५२०/- |

वरील कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**मुन्ना सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, कई तरीके से आर्थिक प्रशासकीय मंजुरी स्टँडींग से ली जाते है और स्टँडींग समिती के सब सदस्यो को उसमे पास किए गये प्रस्ताव के लिए जिम्मेदार ठहराया जाता है। अगर कभी नियम विरुध्द कानुन हुआ तो इतिहास मे दृष्टांत मिलेंगे जहाँपर नगरसेवको को जेल की गई है। यहाँपर हमसे मंजुरी भी ली जा रही है। ४१ लाख रुपये की लेकीन यह काम के साथ मे अंदाज पत्रक तयार किया गया है यह भी बताया गया है। पर अंदाज पत्रक मे क्या हेड है क्या लेंथ है क्या ब्रेथ है? इसे बिना बताये ऑन रेकॉर्ड लाये गये। इस तरह का अंदाज पत्रक लाया जाता है जो अनुचित है। नगरसेवकोको अंधेरे मे रखनेका बिना जानकारी के प्रस्ताव पास करने का और सिर्फ मजुरी लेने का यह बिलकुल मुर्ख बनानेवाला काम है पुरे जानकारी के साथ अंदाज पत्रक यहॉ देना चाहीए उसपे डिसकशन होना चाहीए कई हेड ऐसा हो सकते हो जो गलत हो। इनपे चर्चा की जा सकती है। हो सकता बिलकुल सही हो। लेकीन नगरसेवको को जब काम ही नही मालुम लेंथ कितनी है? ब्रेथ कितनी है? तो अंदाज पत्रक पे रक्कम कैसे हुआ जो हम कैसे हा कर सकते है।

**प्रभात पाटील :-**

लेकीन पास हो गया ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मॅडम, अगर पास होने की बात करे तो उनके पास जाके मैने देखे आपने देखा क्या? आप ४१ लाख रुपये बिना जॉच किए देने को तैयार है।

**प्रभात पाटील :-**

ऐसे थोडी होता है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

ऐसे ही हो रहा है। मैने देखा मैने पहले यह बोला की, कोई भी प्रस्ताव स्टॅन्डीग मे पास होता है उसकी जिम्मेदारी नगरसेवकोकी होती है। गलत पास हुआ, नियम विरुध्द हुआ तो उसकी सजा उसकी गाज हम पर गिरती है। हम बिना अंदाजपत्रक देखे क्यों पास करे।

**प्रभात पाटील :-**

आपने जो देखा है वह बोला ना।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मॅडम, ऑन रेकॉर्ड अगर वह आयेगा आज वो अंदाजपत्रक है। अगर ऑन रेकॉर्ड स्टॅन्डीग मे आया था तो बादमे उसपे हेर फेर भी नही हो सकता है। ऑन रेकॉर्ड आ गया। अभि ऑन रेकॉर्ड नही आया अंदाजपत्रक। आपने इसमे अमाऊंट पास किया है, अंदाजपत्रक पास नही किया है। आपने हेड पास नही किया है। यहॉपर हेड पास होने के बादमे अगर बादमे निकालते है की..........

**दिपक खांबित :-**

सुचना घ्यायची आहे.

**प्रभात पाटील :-**

हेड मे तो बहुत सारा होता है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आज अंदाजपत्रक देने मे आपत्ती क्या है? यहॉपर हर गोषवारा के साथ अंदाजपत्रक देने मे आपत्ती क्या है?

**दिपक खांबित :-**

ही प्रॅक्टीस नाही मॅडम, कसे असते की, स्थायी समितीला गोषवारा दिला जातो आणि बाकी जी काही माहिती असेल ती डिपार्टमेंटला उपलब्ध असते. ही प्रॅक्टीस आहे. मी केलेली प्रॅक्टीस नाही. ही कुठल्याही महानगरपालिकेमध्ये, कुठल्याही स्थानिक संस्थामध्ये किंवा आज विधानसभेतसुध्दा, विधान परिषदेतसुध्दा, लोकसभेतसुध्दा काम पास होतात. त्यामुळे द्यायची हीच पध्दत आहे. जे काही डीटेल्स टेक्नीकल मॅटर्स, इस्टीमेट वगैरे असतात ते डिपार्टमेंटकडे असतात. त्यामुळे ही प्रॅक्टीस तशीत चालत आलेली आहे.

**शरद पाटील :-**

तुम्ही आज गोषवाऱ्यामध्ये दिले आहे की, भुयारी ब्रिज बनवायचा आहे. भुयारी आहे की पादचारी आहे.

**दिपक खांबित :-**

भुयारी, पदाचारी कन्सलल्टंट नेमणार तो ज्याप्रमाणे रिपार्ट देईल त्याप्रमाणे होणार ते. त्याने रिपोर्टमध्ये दिले की, वरुन करायचे खालून पण करायचे त्याप्रमाणे होणार ते.

**शरद पाटील :-**

भाईंदर पूर्वेला फाटक जवळील तुम्हाला आता तिथे रस्ता बनवायचा आहे. ह्याला तुम्ही किती मंजूर केले? ४१ लाख ८८ हजार रु. आता कुठून कुठपर्यंत केवढा मोठा रस्ता आहे तो त्याला एवढे पैसे लागतात का?

**दिपक खांबित :-**

लागतात ना.

**शरद पाटील :-**

कुठून ते कुठपर्यंत आहे.

**दिपक खांबित :-**

तो टी शेपमध्ये रस्ता आहे. साईबाबा मंदिरपासून सरळ ब्रिजपर्यंत.

**शरद पाटील :-**

साईबाब मंदिर पासून म्हणजे साईबाबा मंदिर कुठे आले, ह्या मेन रोडला आहे.

**दिपक खांबित :-**

महाराजा प्रताप चौक तिथुन सबवे पर्यंत जाईल आणि पुन्हा तो जो आपला वॉटर सप्लाय आहे तिथे आपण नाला केला आहे त्याच्या बाजूला टॅंकर पॉईंट आहे.

**शरद पाटील :-**

हे डांबरी रोड बनवणार की, क्रॉंक्रीट बनवणार?

**दिपक खांबित :-**

डांबरी रस्ता बनवणार.

**शरद पाटील :-**

तिथे दररोजचे पाण्याचे टॅंकर येतात पाणी सांडते. त्याच्याने रस्त परत खराब होणार आहे. मग, त्याचा आपल्याला फायदा काय?

**दिपक खांबित :-**

गटर घेतले आहे. तर खराब नाही होणार.

**शरद पाटील :-**

गटर जरी घेतले तिथे पाणी पडल्यावर डांबराचा रस्ता खराब होतो.

**दिपक खांबित :-**

नाही होत.

**रोहिदास पाटील :-**

४१ लाखाला आपण किती एरिया पकडला? ही एरिया एवढी आहे. म्हणजे त्याचा रेट तरी माहित पडेल आपल्याला की, १०० ब्राससाठी एवढे आहे. आडवे गेले तिडवे गेले हे सगळे मान्य केले. पाण्याचे टॅंकर भरणार

आणखीन चांगले आहे. सबवे साठी जायला रस्ता होईल चांगले आहे. आपण वर्षभरामध्ये २ वर्षामध्ये, ३ वर्षामध्ये त्याच्यामध्ये असलेले अडथळे आपण काढू शकलो नाही.

**दिपक खांबित :-**

२५ हजार स्क्वेअर फुट जागा आहे.

**रोहिदास पाटील :-**

सबवेच्या ठिकाणी पुन्हा पुन्हा सांगुनसुध्दा असलेले अडथळे आपण काढत नाही. ईस्टीमेटशी काही संबंध नाही. आपल्या कार्यक्षमतेचा हा प्रश्न आहे. त्याठिकाणी महिला पूर्वेकडून पश्चिमेला जातात, पश्चिमेकडून पूर्वेला जातात. दागीने असतात. बऱ्याचवेळा सुचना देऊनसुध्दा अडथळा काढला नाही. गाड्या उभ्या असतात ते काढत नाही. आपण सी.सी. कॅमेरे सांगतो. जगभर चाललेल्या महिलांच्या सुरक्षेचा विषय आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका आहे कुठे? १२०० कोटीची महापालिका १ रु. तुम्हल खर्च करत नाही. महिलांच्या सुरक्षेसाठी आम्ही सांगूनसुध्दा, टाहो फोडून सांगतो तरी तुम्ही ऐकायला तयार नाही. धोरण काय आहे? महिलांना सुरक्षा द्यायची की नाही? रस्ता बनवायचा आहे. ज्या ज्या वेळी चेन चोरली, दागीने चोरले त्या त्या वेळी महापालिकेत येतो. बघा काल असे झाले. कधी करणार? ह्याचा रिपोर्ट यायचा आहे, त्याचा रिपोर्ट यायचा आहे, ती मंजूरी नाही, रिटेन्डरींग, रिटेन्डरींग किती वेळेला? रिटेन्डरींग कशासाठी पाहिजे. आयुक्तांना, सभापतींना काही राईट्स आहेत की नाही? ही हा खर्च त्यांच्या अधिकारात ते करु शकतात. जनतेच्या हितासाठी ते करु शकतात. असा तरी सल्ला द्या की, आम्ही त्या ह्याच्याने करु शकतो. आज मुंबईमध्ये, ठाण्यामध्ये सगळ्या ठिकाणी सगळ्या महापालिकेत सी.सी. कॅमेरे आहेत. आपल्याकडे एकही नाही. श्री. ओमप्रकाश ह्यांनी एक लावला तो ही बंद केला. काहीतरी सांगायला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

संबंधित उपायुक्त नाहीत, सगळ्या ठिकाणी सी.सी. कॅमेरे..........

**शरद पाटील :-**

आमचे ह्या विषयावर असे म्हणणे आहे की, जो ४१ लाख ८८ हजार रुपयाचे ईस्टीमेट काढलेले आहे, ह्याच्यात भ्रष्टाचार आम्हाला अभाव वाटतो. त्याच्यामुळे आम्ही आमचा एक ठराव मांडतो.

**डॉ राजेंद्र जैन :-**

प्रकरण क्र. १२२ के संबंधीत श्री. खांबित साहबने जवाब दिया की इधर पध्दती है, उधर यह पध्दती है। तो मै एक गोष्ट कह रहा हू की, अपने महानगरपालिका के पध्दती के संबंध मै ठराव पेश करता हू। महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध विकासकामांकरीता सर्व विभागातून कामाच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेकरीता विषय मा. स्थायी समितीमध्ये दिले जात असतात. या विकासकामांचे विषय संबंधीत विभाग देत असताना फक्त प्रशासकिय व आर्थिक रकमेचा उल्लेख केला जातो. अश्या प्रस्तावामध्ये ज्या विषयाकरीता प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिली जाते त्याच्या कामाचे अंदाजपत्रकाची माहीती सदस्यांना दिली जात नाही. त्यामुळे सदस्यांना निर्णय घेणे अडचणीचे जाते व अपूर्ण माहीतीच्या आधारावर कामांना प्रशासकिय व आर्थिक मंजुरी संबंधीत विभाग घेत असतात.

याकरीता यापुढे ज्या कामांकरीता आर्थिक व प्रशासकिय मंजुरीची शिफारस स्थायी समितीकडून पाहीजे असल्यास कामांची संपूर्ण माहीती, कामाचे अंदाजपत्रक सदस्यांना मा. स्थायी समितीच्या अजेंडाच्या जोडीला देण्यात यावे अशी मी सुचना मांडीत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिपक खांबित :-**

ठराव आहे की, सुचना आहे ठरावात.

**शरद पाटील :-**

ठराव आहे. सुचना नाही.

**डॉ. राजेंद्र जैन**

ठराव है।

**शरद पाटील :-**

आता ठरावच मांडतो आम्ही, सुचना कशाला? आमची सुचना तुम्ही मान्य करणार नाही.

**दिपक खांबित :-**

ठरावामध्ये सुचना होऊ द्या ना.

**डॉ. राजेंद्र जैन**

ठराव है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मतदान होईल साहेब.

**शरद पाटील :-**

तुम्ही सुचना घेत असाल तर सुचना आहे.

**मा. सभापती :-**

सुचना घेऊ.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सुचना घ्या ना.

**शरद पाटील :-**

सुचना घेत असाल तर सुचना घ्या.

**रोहिदास पाटील :-**

सुचनेसहित ठराव मंजूर करा, असे करा.

**मा. सभापती :-**

सुचनेसहीत ठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. १२२ :-**

भाईंदर (पूर्व) फाटक रोडवरील फाटक (साईबाबा मंदिर) ते सब-वे पर्यंतचा रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे व नविन गटार बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १११ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) फाटक रोड लगत फाटक (साईबाबा मंदिर) ते सब वे पर्यंतचा रस्ता हा अतिशय खराब झालेला असून पाणी पूरवठा विभागाच्या टँकर ची ये-जा होत असल्यामुळे सदरचा रस्ता हा नादुरूस्त झालेला आहे. त्यामुळे सदर रस्ता व रस्त्यालगत नविन गटार बनविणे आवश्यक आहे व तसेच तांत्रिकदृष्ट्या सदर कामाची आवश्यकता आहे. त्यानुसार सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) फाटक रोड वरील फाटक (साईबाबा) मंदिर ते सब वे पर्यंतचा रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे व नविन गटार बनविणे. | रु.४१,८८,५२०/- |

वरील कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक - सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. मुन्ना सिंह**

**सदर ठरावामध्ये सुचक डॉ. राजेंद्र जैन व अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध विकासकामांकरीता सर्व विभागातून कामाच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेकरीता विषय मा. स्थायी समितीमध्ये दिले जात असतात. या विकासकामांचे विषय संबंधीत विभाग देत असताना फक्त प्रशासकिय व आर्थिक रकमेचा उल्लेख केला जातो. अश्या प्रस्तावामध्ये ज्या विषयाकरीता प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिली जाते त्याच्या कामाचे अंदाजपत्रकाची माहीती सदस्यांना दिली जात नाही. त्यामुळे सदस्यांना निर्णय घेणे अडचणीचे जाते व अपूर्ण माहीतीच्या आधारावर कामांना प्रशासकिय व आर्थिक मंजुरी संबंधीत विभाग घेत असतात.

याकरीता यापुढे ज्या कामांकरीता आर्थिक व प्रशासकिय मंजुरीची शिफारस स्थायी समितीकडून पाहीजे असल्यास कामांची संपूर्ण माहीती, कामाचे अंदाजपत्रक सदस्यांना मा. स्थायी समितीच्या अजेंडाच्या जोडीला देण्यात यावे अशी मी सुचना मांडीत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२३, मिरारोड (पूर्व) रॉयल पॅलेस इमारत जवळील इलेक्ट्रीक पोल क्र. XSV/००९/००५ ते इलेक्ट्रीक पोल क्र. XSV/००९/०११ पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, एकतर आज इथे पोलचे नंबर दिलेत. पोलच्या नंबरने आम्हाला माहित पडणार नाही. एखाद्या बिल्डींगचे नाव दिले असते किंवा एरियाचे नाव सांगितले असते तर माहित पडले असते. आता पोलचे नंबर तिथे शोधायला जावे लागेल.

**रोहिदास पाटील :-**

सभापती साहेब, आपल्याकडे चांगली एल.सी.डी. ची प्रोव्हिजन आहे. इथपासून इथपर्यंत गटर बनणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हा नकाशा आहे. त्याला हे गटर आहे, रस्ता आहे. हा इलेक्ट्रीक पोल

आहे. जो उल्लेख उल्लेख केला तो पोल इकडे आहे. दाखवायला काय हरकत आहे. आपण एल.सी.डी. घेतला तो कशासाठी घेतला? तुम्ही आयुक्त म्हणून रुलिंग द्या. पुढच्या स्टॅन्डींगला नेक्स्ट टाईम लागलेले असेल. एल.सी.डी. चालू असेल. बटन दाबले की चालू. जे बघायचे ते बघा.

**प्रभात पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रॉयल पॅलेस इमारत समोरील इलेक्ट्रिक पोल क्र. XSV/००९/००५ ते इलेक्ट्रिक पोल XSV/००९/०११ पर्यंत कच्च्या स्वरुपाची गटार आहे. सदर गटर पावसाळयात भरत असून पाणी रस्त्यावर जमा होऊन जलभराव स्थिती निर्माण होते. सदर ठिकाणी रस्त्यावर वारंवार पाणी साचत असल्याने रस्ता खराब होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याने सदर गटर करणे आवश्यक आहे. सदर कामास रु. ३८,८८,२५०/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त कामाकरीता सन २०१३-१४ च्या वार्षिक अर्थसंकल्पात “नवीन गटारे/नाले बांधकाम” या लेखाशिर्षाखाली पुर्ननियोजनाव्दारे तरतुद करण्यात आली असुन त्यापैकी रु. ८४,६९,९४७/- इतकी शिल्लक आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**अनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मुन्ना सिंग :-**

मेरी सुचना है। काशिमिरा स्मशानभुमी शेडची पूर्नबांधणी करुन इतर आवश्यक कामे करणे कामी रु. ५०.०० लक्ष रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे ही सूचना मूळ ठरावात समाविष्ट करुन घ्यावी.

**शर्मिला बगाजी :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

ही जी सुचना ठेवलेली आहे ती नियमानुसार आहे की नाही, ह्याचे उत्तर प्रशासनाने आम्हाला द्यावे. कुठच्या नियमाखाली आहे? कसे काय आहे ते आम्हाला समजून सांगावे. आम्हाला त्याचा विरोध नाही. पण नियम सांगा आणि नंतर करा काय करायचे ते.

**दिपक खांबित :-**

त्यांची सुचना आहे.

**शरद पाटील :-**

सुचना आणि एखाद्या गोषवाऱ्याला मान्यता देणे फरक आहे. खांबित साहेब तुम्ही आम्हाला कुठचा नियम सांगता. त्यांनी सुचना मांडली. तर त्यांनी कुठल्या नविन कामाची सुचना मांडली का?

**नगरसचिव :-**

सभागृहात सुचना मांडल्यास सदस्याचा अधिकार आहे त्याप्रमाणे मांडावी. सुचना वॅलीड आहे की नाही ते प्रशासन बघेल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

नगरसचिव महोदय, अभि इसके ५ मिनिट पहले सुचना सदन ने पास किया है की, कोई भी कानुन का अंदाजपत्रक आये बिना एसको मंजूरी नही देंगे। यह सुचना उसके अगेन्स्ट जाती है।

**नगरसचिव :-**

मतदानाला टाकून विरोध करुन टाका.

**मुन्ना सिंग :-**

अभि थोडी लागु हुआ, डॉक्टर साहब जो आप बता रहे है। वो अभि तुरंत लागु हुआ क्या? ऐसा कभी लागु होता है क्या?

**शरद पाटील :-**

हा विषय जो आला आहे तो नियमानुसार आहे की नाही तेवढे सांगा प्रशासनाने.

**नगरसचिव :-**

सुचना घेणे माझे काम आहे.

**शरद पाटील :-**

सांगा ना नियमानुसार प्रशासनाने आहे की नाही ते? आम्हाला माहिती द्याल की नाही. उद्या ह्याला जबाबदार कोण? आम्ही का तुम्ही?

**दिपक खांबित :-**

सुचना मांडायचा हा अधिकार सदस्यांचा आहे. सुचना स्विकारायचा वगैरे तो अधिकार सभापतींचा आहे. त्यावर कारवाई करायची की नाही?

**शरद पाटील :-**

सुचना आणि एखाद्या गोष्टीचा ठराव ह्याच्यात फरक आहे ना. तुम्ही मर्ज करायला लावता ठरावामध्ये. ते काम घ्यायचे म्हणून की ती आर्थिक मंजूरी आहे ती. असे नाही ना.

**दिपक खांबित :-**

हा विषय प्रशासनाने दिलेला नाही.

**शरद पाटील :-**

तुम्ही विषयच घ्या ना. विषय घेऊनच तुम्ही करा.

**मुन्ना सिंग :-**

शरद पाटील साहब, अभि मा. सभापती साहबने बोला है तो किया है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

इस विषय की जानकारी नही है। कितना खर्चा है, क्या है, कोई जानकारी नही है। ५० लाख रुपया खर्चा कैसे होनेवाला है वो मालुम तो पडे ना। किस साईट पर खर्चा करेंगे।

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

आमचा विरोध नोंदवून घ्या.

**मा. सभापती :-**

साहेब, भारतीय जनता पार्टीचा विरोध आहे की कसे काय?

**शरद पाटील :-**

भारतीय जनता पार्टीचा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२३**

मरारोड (पूर्व) रॉयल पॅलेस इमारत जवळील इलेक्ट्रीक पोल क्र. XSV/००९/००५ ते इलेक्ट्रीक पोल क्र. XSV/००९/०११ पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ११२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रॉयल पॅलेस इमारत समोरील इलेक्ट्रिक पोल क्र. XSV/००९ /००५ ते इलेक्ट्रिक पोल XSV/००९/०११ पर्यंत कच्च्या स्वरुपाची गटार आहे. सदर गटर पावसाळयात भरत असून पाणी रस्त्यावर जमा होऊन जलभराव स्थिती निर्माण होते. सदर ठिकाणी रस्त्यावर वारंवार पाणी साचत असल्याने रस्ता खराब होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याने सदर गटर करणे आवश्यक आहे. सदर कामास रु. ३८,८८,२५०/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त कामाकरीता सन २०१३-१४ च्या वार्षिक अर्थसंकल्पात "नवीन गटारे/नाले बांधकाम" या लेखाशिर्षाखाली पुर्ननियोजनाव्दारे तरतुद करण्यात आली असुन त्यापैकी रु. ८४,६९,९४७/- इतकी शिल्लक आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक - सौ. प्रभात पाटील          अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. मुन्ना सिंह व अनुमोदक श्रीम. शर्मिला बगाजी ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

काशिमिरा स्मशानभुमी शेडची पूर्नबांधणी करुन इतर आवश्यक कामे करणे कामी रु. ५०.०० लक्ष रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे ही सूचना मूळ ठरावात समाविष्ट करुन घ्यावी.

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२४, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्ट्रीट लाईट पोल बसविण्याच्या प्रस्तावांना मान्यता देणे.

**प्रभात पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविण्याबाबत चे प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार मे. रिलायन्स इन्फ्रा लि. यांच्यासोबत सयुक्त पहाणी करुन खालील प्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | स्ट्रीट लाईट पोल लावण्याचे ठिकाण/रस्त्याचे नाव | मंजूर पोल संख्या |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत गौरव इन्केल्व्ह रोड मस्जित मिरारोड (पूर्व) येथे नविन | ०४ |

| | | |
|---|---|---|
| | स्ट्रिट लाईट पोल लावणे. | |
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक धक्का डोंगरी व्हिलेज भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १० |
| ३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक व्हिलेज सेंट ॲन्डयु चर्च जवळ भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ४ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक व्हिलेज उत्तन भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक व्हिलेज उत्तन भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १४ |
| ६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील तलाव रोड भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| ७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सुंदर विहार हॉटेल ते भारतनगर नवघर रोड नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| ८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सेनानगर गोडदेव व्हिलेज भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| ९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नवघर जंक्शन हनुमान मंदिर भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| १० | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत व्यंकटेश पार्क भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| ११ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत भारती पार्क मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १८ |
| १२ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत राई शिवनेर नगर भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| १३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मोर्वा भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०७ |
| १४ | मिरा-भाईंदर सेक्टर ६ प्ले ग्राऊंड व सरवेश्वर हिंदु मंदिर मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०८ |
| १५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील पटेल कॉम्पलेक्स मिरा व्हिलेज मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०९ |
| १६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील क्विन्स पार्क दिपक हॉस्पिटल ते सेवन स्केअर अॅकडमी मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ४२ |
| १७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गौरव अविष्कार बिल्डींग समोर येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| १८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत बेवर्ली पार्क रोड आणि एम. आय. जी. कॉम्पलेक्स रोड विनय हारमेटेज हौसिंग कॉम्पलेक्स मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०९ |
| १९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत गोडदेव स्मशान रोड काशिनगर भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १४ |
| २० | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत ज्योती पार्क इंद्रलोक कॉम्पलेक्स गोडदेव व्हिलेज भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| २१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत धावगी डोगरी उत्तन हॉटेल जवळ भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| २२ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत ओमकार सोसायटी विजय पार्क मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०६ |
| २३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत आंबेडकर नगर भाईदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०८ |
| २४ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत वेलंकनी चर्च आणि उत्तन घाटेबंदर भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १४ |
| २५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक डोंगरी भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०९ |
| २६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत उत्तन डोंगरी रोड भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट | ३० |

| | | |
|---|---|---|
| | लाईट पोल लावणे. | |
| २७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जांगीड इस्टेट कनकीया रोड लक्ष्मी पार्क मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १३ |
| २८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लक्ष्मी पार्क रोड रामदेव पार्क मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १३ |
| २९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सेना नगर गोडदेव व्हिलेज भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ३० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जैसल पार्क चौपाटी भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०१ |
| ३१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गौरव रेसिडेन्सी मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| ३२ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील साईबाबा नगर शिवशक्ती नगर डाचकुल पाडा माशाचा पाडा मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०७ |
| ३३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एम.टी.एन.एल रोड डी.सी.बी. बँक मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| ३४ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील केबिन रोड दिपक नगर केबीन रोड भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०२ |
| ३५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नवघर रोड दळवी चाळ ते परब मसाला स्टोर्स भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १२ |
| ३६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शिवशक्ती नगर शिर्डीनगर भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०७ |
| ३७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एम.आय.आर.अे हॉस्पीटल डि मार्ट भाईंदर (प.) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ३८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा व्हिलेज हनुमान मंदिर जवळ मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ३९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील म्हाडा कॉलनी बालाजी हॉटेल मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १० |
| ४० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशि व्हिलेज रोड मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १० |
| ४१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिल्व्हर सरीता ट्रॅन्झीट कॅम्प मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०६ |

वरील ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविण्याच्या प्रस्तावाना व मे. रिलायन्स इन्फ्रा लि. यांना वीज बिल व देखभाल दुरूस्तीची देयके प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, इसमे और एस.टी. स्टॅन्ड लगाने की सुचना है। वह तो हम आपको सब अलग से दे देते है। यह नितीगत सुचना है।

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

और स्ट्रीट लाईट लगाने की सुचना है, वह हम आपको अलग से दे देंगे। क्योंकी पर नितीगत सुचना यह है की, पिछले समय मे स्टॅन्डीग के अंदर जब ट्रॅफीक पोल लगाने की बात हुई पुरे मिरा भाईंदर मे कितने पोल लगेंगे? कहॉ लगेंगे? खांबित साहबने एक्सेप्ट किया था, आप निर्देशिका देखे की हर नगरसेवक को लीस्ट दी जाएगी। उसके एरिये मे इतने पोल लगे। अगर ४०० पोल लगाये, ४००० पोल लगाये, वह लगे या नही लगे उसकी जानकारी उसका व्हेरीफिकेशन कैसे करेंगे? उसके लिए हर नगरसेवक को लिस्ट देने की बात थी। वह दि नही गई है। इसलीए मै वापस सुचना डालता हु की, हर नगरसेवक के एरिए मे कितने पोल लगेंगे वह पोल की सुचना नगरसेवकको दि जाए। ताकी वो व्हेरीफाय कर सके। कितने पोल लगे और कितने नही लगे। मै सुचना पढके बोल देता हूँ। ज्या नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये स्ट्रीट लाईट लावणार त्या ठिकाणी किती पोल लावणार

याची माहिती त्या त्या वॉर्डामधील नगरसेवकांना देण्यात यावी. यह मेरी सुचना है। दुसरी बात इसमे आपने लिखा है की यह स्वखर्चे से रिलायन्स काम कर रही है और ऐसा दिखाने को लगता है, मै खांबित साहब से सब नगरसेवको को जानकारी के लिए मै यह जानना चाहूँगा। की एक मिरा भाईंदर नगरपालिका मे कितनी स्ट्रीट लाईट लगी हूई है। महिने का उसका बिल कितना आता है। ईफेक्टीवली एक बिल एक स्ट्रीट लाईट के उपर कितना खर्च करते है और यह स्ट्रीट लाईट लगायेंगे इसमे कई मेन्शन नही किया हुआ है की उसकी ब्रॅकेट का साईज क्या होगा? ब्रॅकेट छोटे भी आते है बडे भी आते है। वॉल्टाज ४० का भी होता है, ६० का भी, १०० का भी होता है तो इसते स्पेसिफिक जरा भी नही है।

**रोहिदास पाटील :-**

पोल कंपनी लगाती है अपनी महापालिका नही लगाती।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

हम उसको निर्देष देते है। बडा लगाओ, छोटा लगाओ उसके हिसाब से। तो कृपया आगे से इसमे यह भी स्पष्ट करने का की जहाँ भी नगरसेवक को यहाँ लगायेंगे उनको सुचना देने का की, आपका पोल हाईट का, ब्रॅकेट साईज का और व्हॉटेबल का...............

**दिपक खांबित :-**

हाईट नही आयेगा। वह कौनसा सोडीयम व्हेपर है, डबल ब्रॅकेट है, सिंगल ब्रॅकेट है। वह कौनसे नगरसेवके वॉर्ड मे है यह आपको डिटेल स्टँडींग को देने का।

**शरद पाटील :-**

तसाच विषय आहे तो तुमच्या ज्या लाईट कमी देतात ना. आता लावलेले बल्ब आहे त्याची लाईट एकदम कमी आहे ते बदली करुन घेण्याबद्दल चे लेटर आले असतील त्या पध्दतीने तुम्ही करुन घ्या आणि माझ्या माहितीनुसार भाईंदर पूर्व, केबिन रोड, दिपक नगर, केबिन रोड येथे स्ट्रीट लाईट पोल लावला आहे तिथे एकच लावला आहे आणि तुम्ही इथे दोन लिहिली आहेत. आता ते माझ्या इकडचं आहे म्हणुन मला माहित पडलं. दुसरीकडेच कोणाचं असेल तर कसं माहित पडेल ते मला माहित नाही.

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते, खांबित साहेब मी एक लेटर दिलेलं की मिरा भाईंदर महानगरपालिका मध्ये जे पोल लावलेले आहेत. त्याच्यावर नंबर, त्याचा कलर हे सगळं सडलेलं आहे तर ते मी कलर लावून नंबर टाकण्यात यावा याची मागणी केलेली.

**दिपक खांबित :-**

आपण तुमच्याकडे लावले पेणकरपाड्यामध्ये.

**अनिता पाटील :-**

पेणकर पाड्यात तुम्ही केलं का?

**दिपक खांबित :-**

नाही तुमच्याकडे लावले तसं मधल्या काळामध्ये काय होतं की, रिलायन्स एनर्जीने पोल लावायचे बंद केले म्हणजे जिकडे त्यांची गाडी जात नाही किंवा १० फुटापेक्षा कमी रस्ते आहेत तिकडे आपण काही स्ट्रीट लाईट लावल्या होत्या त्याठिकाणी आपले स्ट्रीट लाईट पोल आहेत.

**अनिता पाटील :-**

साहेब, मी आपल्या स्ट्रीट लाईट पोल बद्दलच बोललेली ते सडलेल्या स्थितीत आहेत काही पोल पडलेले आहेत त्यांचा कलर गेलेला आहे. त्याच्यावर नंबर नाही एखादा पोल बंद असला की, कळवायचं कसं? कुठला नंबर द्यायचा?

**दिपक खांबित :-**

त्याकरीता आपण एक ठेकेदार नेमलेला आहे. शेखर म्हणुन त्याला पाठवतो आणि तुमचे सगळे जे पोल असतील ती त्याची जबाबदारी आहे काहीही झालं तरी ते त्याला करुन द्यायचं आहे.

**अनिता पाटील :-**

माझी आणखीन सुचना आहे की, प्रभाग क्रमांक ४० मध्ये मी पोल ची मागणी केली आहे. नविन पोल संबंधीत ते सुध्दा ह्या ठरावामध्ये घेण्यात यावं.

**दिपक खांबित :-**

लेखी द्या.

**अनिता पाटील :-**

लेखी पण दिलेलं आहे.

**दिपक खांबित :-**

पेणकरपाड्याचे तुम्ही कुठे बोलले? कुठे कलर वगैरे करायचे?

**अनिता पाटील :-**

सगळेच एमबीएमसी चे जेवढे पोल लावले त्या सगळ्यांचे नंबर गेलेले आहेत.

**शरद पाटील :-**

आपल्याला या पोलवर खर्च किती आहे? महापालिका त्याच्यावर किती खर्च आहे? महापालिका त्याच्यावर किती खर्च करते? आपल्याला काय खर्च द्यायला लागतो?

**दिपक खांबित :-**

व्हॅटेज प्रमाणे आहे. ४०० रुपये जवळ जवळ प्रत्येक पोलच बिल येते आपले १३ हजार पोल आहेत मिरा भाईंदर मध्ये रिलायन्स ने बीएसएसने बसवलेले तर आपलं बिल आहे. महिन्याला ५० ते ५१ लाख रुपये बिल येतं म्हणजे प्रती पोल आपल्याला जवळ जवळ ४०० रुपये पोल पडतं. कुठलं पोल छोटं असेल तर २५० रुपये येते जास्त असेल तर ८०० रुपये पण येते. हायमस्ट असेल तर २००० रुपये सुध्दा बिल येते. ॲव्हरेजचं पोलचं बिल आहे ते ४०० रुपये येते आणि तेवढाच मेन्टेनन्सचा खर्च येतो. मेन्टेनन्स सुध्दा रिलायन्स करते जवळ जवळ सरासरी ७५० ते ८०० रुपये खर्च आपल्याला प्रती पोलचा खर्च होतो.

**शरद पाटील :-**

मेन्टेनन्सचा खर्च आपल्याला द्यायला लागतो.

**रोहिदास पाटील :-**

एकतर त्यांच मिटर रिडींग आहे आम्हाला नीट माहिती द्या.

**दिपक खांबित :-**

मिटर रिडींग प्रमाणे.

**रोहिदास पाटील :-**

ज्या ठिकाणी पोल बंद असते त्यावेळी आपली गैरसोय होते त्यामुळे त्यांना आपण ओरडत रहायचं ते आपलं काम आहे पण जेव्हा पोल बंद असतात. त्याच बिल येत नाही हे ही आपल्या लक्षात ठेवलं पाहिजे.

**दिपक खांबित :-**

येत नाही पण मेन्टेनन्स चार्जेस जे आहे ते आपल्याला सगळे द्यायला लागते तर त्याकरीता आपण ॲग्रीमेंट करायला लावलं आहे.

**रोहिदास पाटील :-**

सगळे पोल पेटले पाहिजे. अस प्रत्येक नगरसेवकांच काम आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, एक सुचना है के आपने आश्वासन दिया था की, लेकीन उसने लिस्ट पे नाम नही है।

**रोहिदास पाटील :-**

पोलच्या बाबतीत सगळ्यांच्या कोणाच्याही सुचना असल्या म्हणजे आपण प्रशासनाला अधिकार देवू की २-४ पोल नंतर कोणी सांगितलं तर ते लावावे.

**शरद पाटील :-**

आज समजा स्थायी समितीचे सदस्य आहेत बाकी सदस्य आहेत त्यांनी नंतर दिले की घ्यायचे.

**रोहिदास पाटील :-**

शहरात लाईट लागली पाहिजे.

**प्रकरण क्र. १२४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्ट्रीट लाईट पोल बसविण्याच्या प्रस्तावांना मान्यता देणे.

**ठराव क्र. ११३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविण्याबाबत चे प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार मे. रिलायन्स इन्फ्रा लि. यांच्यासोबत सयुक्त पहाणी करुन खालील प्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | स्ट्रीट लाईट पोल लावण्याचे ठिकाण/रस्त्याचे नाव | मंजूर पोल संख्या |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत गौरव इन्केल्व्ह रोड मस्जित मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक धक्का डोंगरी व्हिलेज भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १० |
| ३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक व्हिलेज सेंट ॲन्डयु चर्च जवळ भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ४ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक व्हिलेज उत्तन भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक व्हिलेज उत्तन भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १४ |
| ६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील तलाव रोड भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |

| | | |
|---|---|---|
| ७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सुंदर विहार हॉटेल ते भारतनगर नवघर रोड नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| ८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सेनानगर गोडदेव व्हिलेज भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| ९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नवघर जंक्शन हनुमान मंदिर भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| १० | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत व्यंकटेश पार्क भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| ११ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत भारती पार्क मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १८ |
| १२ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत राई शिवनेर नगर भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| १३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मोर्वा भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०७ |
| १४ | मिरा-भाईंदर सेक्टर ६ प्ले ग्राऊंड व सरवेश्वर हिंदु मंदिर मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०८ |
| १५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील पटेल कॉम्पलेक्स मिरा व्हिलेज मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०९ |
| १६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील क्विन्स पार्क दिपक हॉस्पिटल ते सेवन स्केअर अॅकडमी मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ४२ |
| १७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गौरव अविष्कार बिल्डींग समोर येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| १८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत बेवर्ली पार्क रोड आणि एम. आय. जी. कॉम्पलेक्स रोड विनय हारमेटेज हौसिंग कॉम्पलेक्स मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०९ |
| १९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत गोडदेव स्मशान रोड काशिनगर भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १४ |
| २० | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत ज्योती पार्क इंद्रलोक कॉम्पलेक्स गोडदेव व्हिलेज भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| २१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत धावगी डोगरी उत्तन हॉटेल जवळ भाईंदर (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०५ |
| २२ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत ओमकार सोसायटी विजय पार्क मिरारोड (पूर्व) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०६ |
| २३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत आंबेडकर नगर भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०८ |
| २४ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत वेलंकनी चर्च आणि उत्तन घाटेबंदर भाईदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १४ |
| २५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत चौक डोंगरी भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०९ |
| २६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत उत्तन डोंगरी रोड भाईंदर (प.) येथे नविन स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ३० |
| २७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जांगीड इस्टेट कनकीया रोड लक्ष्मी पार्क मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १३ |
| २८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लक्ष्मी पार्क रोड रामदेव पार्क मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १३ |
| २९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सेना नगर गोडदेव व्हिलेज भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ३० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जैसल पार्क चौपाटी भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०१ |
| ३१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गौरव रेसिडेन्सी मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |

| | | |
|---|---|---|
| ३२ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील साईबाबा नगर शिवशक्ती नगर डाचकुल पाडा माशाचा पाडा मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०७ |
| ३३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एम.टी.एन.एल रोड डी.सी.बी. बँक मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०३ |
| ३४ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील केबिन रोड दिपक नगर केबीन रोड भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०२ |
| ३५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नवघर रोड दळवी चाळ ते परब मसाला स्टोर्स भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १२ |
| ३६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शिवशक्ती नगर शिर्डीनगर भाईंदर (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०७ |
| ३७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एम.आय.आर.अे हॉस्पीटल डि मार्ट भाईंदर (प.) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ३८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा व्हिलेज हनुमान मंदिर जवळ मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०४ |
| ३९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील म्हाडा कॉलनी बालाजी हॉटेल मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १० |
| ४० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशि व्हिलेज रोड मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | १० |
| ४१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिल्व्हर सरीता ट्रॅन्झीट कॅम्प मिरारोड (पूर्व) येथे स्ट्रिट लाईट पोल लावणे. | ०६ |

वरील ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविण्याच्या प्रस्तावाना व मे. रिलायन्स इन्फ्रा लि. यांना वीज बिल व देखभाल दुरूस्तीची देयके प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. शर्मिला बगाजी ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. २६ मधील उत्तन पातान बंदर ते भोतोडी बंदर रोडवर १०, उत्तन नवी खाडी परिसर येथे ५, मोठागाव येथे १०, उत्तन नाका येथे ५, उत्तन देवतलाव येथे ५ व उत्तन नवघर येथे ५ असे एकूण नव्याने ४० स्ट्रीट लाईट पोल बसविणे आहे. तेथे कमी दाबाचे दिवे असल्याने तसेच खांब्यामधील अंतर जास्त असल्याने प्रकाश अत्यंत कमी पडत असून सदर परिसरात अंधार पसरलेला असतो. त्यामुळे तेथे अंधाराचा फायदा घेवून अनैतिक प्रकार घडण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर परिसरातील रस्त्यांवर नविन स्ट्रीट लाईट पोल लावून जास्त दाबाचे दिवे लावण्यात यावेत.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. ६ मधील कस्तुरी पार्क मावली अपार्टमेंट रोडवर १, कस्तुरी पार्क साईबाबा मंदिर जवळ १, सिध्देश्वर महादेव मंदिर जवळ एस.व्ही. रोडवर १, सैफी पार्क (आर.एम.पी. पार्क) जवळ १ व वरदान बंगलो जवळ जेसलपार्क १ असे एकूण नव्याने ५ स्ट्रीट लाईट पोल बसविणे आहे. तेथे कमी दाबाचे दिवे असल्याने तसेच खांब्यामधील अंतर जास्त असल्याने प्रकाश अत्यंत कमी पडत असून सदर परिसरात अंधार पसरलेला असतो. त्यामुळे तेथे अंधाराचा फायदा घेवून अनैतिक प्रकार घडण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर परिसरातील रस्त्यांवर नविन स्ट्रीट लाईट पोल लावून जास्त दाबाचे दिवे लावण्यात यावेत.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. ४० मधील भवानी नगर रोड परिसरात १५, राजीव गांधी परिसर येथे १०, पेणकरपाडा इतर परिसर येथे १० व किसन नगरी येथे १० असे एकूण नव्याने ४५ स्ट्रीट लाईट पोल बसविणे आहे. तेथे कमी दाबाचे दिवे असल्याने तसेच खांब्यामधील अंतर जास्त असल्याने प्रकाश अत्यंत कमी पडत असून सदर परिसरात अंधार पसरलेला असतो. त्यामुळे तेथे अंधाराचा फायदा घेवून अनैतिक प्रकार घडण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर परिसरातील रस्त्यांवर नविन स्ट्रीट लाईट पोल लावून जास्त दाबाचे दिवे लावण्यात यावेत. तसेच भाईंदर (प.) मोतीनगर परिसरात स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात यावे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. श्री. सदस्य प्रशांत दळवी ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. ३८ मधील सेक्टर क्र. ४ शांतीनगर, प्रल्हाद को.ऑप.हौ.सो. समोर १ व चाचा जवाहरलाल नेहरु नाना नानी पार्क या क्षेत्रात नव्याने ५ स्ट्रीट लाईट पोल बसविणे आहे. तेथे कमी दाबाचे दिवे असल्याने तसेच खांब्यामधील अंतर जास्त असल्याने प्रकाश अत्यंत कमी पडत असून सदर परिसरात अंधार पसरलेला

असतो. त्यामुळे तेथे अंधाराचा फायदा घेवून अनैतिक प्रकार घडण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर परिसरातील रस्त्यांवर नविन स्ट्रीट लाईट पोल लावून जास्त दाबाचे दिवे लावण्यात यावेत.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शरद पाटील व अनुमोदक सौ. मिरादेवी यादव ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

रेस्ट हाऊसच्या बाजुला डि. पी. रोड ते वरसावे गाव पर्यंत स्ट्रीट लाईट पोल लावणे. तसेच प्रभाग क्र. ३१ देवातारा बिल्डींगच्या आतून रामदेव पार्क रस्त्यावर पोल लावण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य डॉ. राजेंद्र जैन ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

वॉर्ड क्र. २० मध्ये सुदामानगर ते कमलापार्क पर्यंतच्या रेल्वे नाल्यावर बनविलेल्या स्लॅबवर वेदरशेड टाकणेबाबत नगरसेवक निधीतून व प्रभाग निधीतून काम होणार आहे. तरी आपण सदर नाल्यावर असलेल्या सिंगल ब्रॅकेटच्या पोलला डब्बल ब्रॅकेटचे पोल करावे ही विनंती. जेणेकरून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना त्रास होणार नाही. तसेच प्रभाग क्र. २२ परिसरातील आर्लीन टॉवर व जय अंबे माता मंदिर मार्ग इंडस्ट्रीयल परिसरात स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात यावे. तसेच ज्या नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये स्ट्रीट लाईट लावण्यात येणार ते ठिकाणी व किती पोल लावणार याची माहीती त्या-त्या वॉर्डामधील नगरसेवकांना देण्यात यावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सभापती श्री. राजु यशवंत भोईर ह्यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. ४१ मधील नित्यानंद नगर ते शांतीगार्डन, मिराधाम, हायमस पार्क व म्हाडा वसाहत पर्यंत आवश्यकतेनुसार स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात यावेत.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही:-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२५, शिवसेनाप्रमुख कै. श्री. बाळासाहेब ठाकरे यांची पुण्यतिथी साजरी करण्याबाबत.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात या देशातील दिवंगत राष्ट्रपुरुष तसेच राष्ट्रीय नेत्यांची जयंती तसेच पुण्यतिथी प्रथेप्रमाणे साजरी करण्यात येत आहे. हिंदूहृदयसम्राट माननीय शिवसेनाप्रमुख कै. श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे महाराष्ट्राच्या उभारणीत मोठे योगदान आहे. शिवसेनाप्रमुखांखेरीज महाराष्ट्राचा इतिहास लिहीलाच जावू शकत नाही. अशा या थोर आणि तेजस्वी नेत्याचे निधन दि. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी झालेले आहे. या थोर नेत्याला आदरांजली वाहण्यासाठी माननीय शिवसेनाप्रमुख कै. श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या २३ जानेवारी या जन्मदिवशी त्यांची जयंती तसेच १७ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात दरवर्षी साजरी करण्यात यावी. तसेच हा ठराव मा. महासभेच्या मंजूरीसाठी घेण्यात यावा असा मी ठराव मांडीत आहे.

**शरद पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, या ठरावाला आपण स्वतः आणि सन्मा सर्व सदस्य स्थायी समितीचे यांनी पाठींबा दर्शविल्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

**प्रकरण क्र. १२५ :-**

शवसेनाप्रमुख कै. श्री. बाळासाहेब ठाकरे यांची पुण्यतिथी साजरी करण्याबाबत.

**ठराव क्र. ११४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात या देशातील दिवंगत राष्ट्रपुरुष तसेच राष्ट्रीय नेत्यांची जयंती तसेच पुण्यतिथी प्रथेप्रमाणे साजरी करण्यात येत आहे. हिंदूहृदयसम्राट माननीय शिवसेनाप्रमुख कै. श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे महाराष्ट्राच्या उभारणीत मोठे योगदान आहे. शिवसेनाप्रमुखांखेरीज महाराष्ट्राचा इतिहास लिहीलाच जावू शकत नाही. अशा या थोर आणि तेजस्वी नेत्याचे निधन दि. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी झालेले आहे. या थोर नेत्याला आदरांजली वाहण्यासाठी माननीय शिवसेनाप्रमुख कै. श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या २३ जानेवारी या जन्मदिवशी त्यांची जयंती तसेच १७ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात दरवर्षी साजरी करण्यात यावी. तसेच हा ठराव मा. महासभेच्या मंजूरीसाठी घेण्यात यावा असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी　　　　अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

ठराव सर्वानुमते मंजूर

सही:-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२६, निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**प्रभात पाटील :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ |
| १ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमीरा रोड) पादचारी / भुयारी मार्ग(**Pedestrian Grade Separators / Subways projects**) बांधणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे. | दि. १८/०३/२०१३ | दै.पुढारी / दै. मिड डे दि.१७/०५/२०१३ | दि २०/५/२०१३ |

| | | | **MONARCH SURVEYORS & ENGG CONSULTANTS PVT** |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Description** | **Per Unit** | **Rate in Rs.** |
| 1 | OD Survey | 8 Hrs per Location | **20000** |
| 2 | Foot Fall Counting | 8 Hrs per Location | **10000** |
| 3 | Traffic Count | 8 Hrs per Location | **35000** |
| 4 | Detailed topographical survey with total station and L/S, C/S with auto level including carrying out detailed geographical survey taking trialpits of size 1 x 1 x 1 m at every 200m interval along the centre line of road, for strata classification showing details of permanent / semi-permanent structures, trees, telephone lines, pipe lines, field bunds cross roads upto 100 m or as directed including down loading survey data digitization and preparing plans and cross section 'L' section including introducing necessary road Geometrics working out quantities of various items in C.P. in layers 5 copy with soft copy etc. complete as director by Engineer-In-Charge area with Auto level including closing the traverse etc. complete<br>B) Plain & Rolling Country | Km | **55500** |
| 5 | Procurement of village map / forest map / land plans from forest / revenue authority for preparation of land plan record including necessary payment for the plans, other documents as required for this survey plotting and demarcation on plan etc. complete | Km | **7500** |
| 6 | Taking trial bores 150 mm (6" soft strata) dia in soft strata and in soft rock including all materials such as casing pipes and accessories oil grease steel balls and such materials as required (including conveying the materials and machineries to site of work) preserving the loose samples serially in glass / plastic jar on site of work and conveying the<br>same to H Q of concerned office as directed including SPT test & supply | RM | **8500** |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | Taking trial bores 76.20 mm (3") 0 for 50.80 mm (2) core in by diamond drilling machine with "Nx Bit" with double tube core barel system including preservation of core in standard core boxes etc. complete with testing & result | RM | **1500** |
| 8 | Providing trun tappa core boxes of jungle wood of size 1.25 M x 0.15 M for preserving core samples with all fixtures and fastening handles locking arrangement etc complete | No. | **1500** |
| 9 | Preparation of area contour plans and marking road levels on it in Geographical Information System (GIS) format in UTM WGS 84 grid format | Lump Sum | **27500** |
| 10 | Preparation of rendered 3d digital elevation model existing and proposed cross sections in UTM WGS 84 grid format | Lump Sum | **27500** |
| 11 | Generation & Printing of reports, | | |
| | A 4 | Per page | **20** |
| | A3 | Per page | **38** |
| | A 2 | Per page | **69** |
| | A1 | Per page | **101** |
| | A 0 | Per page | **186** |
| | A 00 | Per page | **230** |
| 12 | Scanning of Reports & Maps | | |
| | A 4 | Per page | **20** |
| | A3 | Per page | **38** |
| | A 2 | Per page | **69** |
| | A1 | Per page | **101** |
| | A 0 | Per page | **186** |
| | A 00 | Per page | **230** |
| 13 | Data entry & creation of data base | Per field | **50** |
| 14 | Taking photographs of site/ properties etc in digital format and supplied in database in jpg format with VGA resolution | Per no. | **50** |
| 15 | Preparation of Walk Through, VR2 or higher resolution | Per Minute | **70000** |

| **SN** | **Description of item** | **Fee (as percentage of Project cost as approved by MBMC from time to time)** | |
|---|---|---|---|
| | | **In figures** | **In words** |
| 1 | Providing assistance in preparation of Feasibility Report and Detailed Project Reports (DPR) including write-ups, designs and estimates of the project | **1.450000** | **One point Forty Five Percent** |
| 2 | Providing services for preparation of tender documents and Bid process management of the projects for 'MBMC' | **0.250000** | **Zero Point Twenty Five Percent** |
| 3 | Functioning as Project Management Consultant & technical auditor of 'MBMC' for project execution. | **2.000000** | **Two Percent** |
| | **Total contract charges**<br>(as percentage of total project cost including professional charges, other expenses, out of pocket expenses, traveling cost & taxes applicable on date of the submission of proposal except service tax and related payments as per Service Tax Rules 2011 or any other tax substituting Service Tax, and value added tax whichever tax shall be paid extra as applicable on date and shall be over and above the bid price) | | |

वरील कामी **मे. मोनार्च सर्व्हेअर्स ॲण्ड इंजिनिअर्स कंन्सल्टंटस् प्रा.लि.** यांनी **वरील दराची** निविदा सादर केलेली आहे. सदर निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. वरील प्रमाणे दराप्रमाणे प्रत्यक्षात आवश्यकतेनूसार सल्लागारास काम करण्याबाबत कळवावे. सल्लागाराने सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केल्यावर आय. आय. टी. मार्फत तपासणी (Proof Check) करुन घ्यावीत व तद्नंतरच सदर कन्सल्टंटचे देयक अदा करावे.

**अनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, यह एक बहोत बडा प्रोजेक्ट है और समय की मांग थी की यहाँपर यह किया जाये डिपार्टमेंटने यह सोचा बहोत अच्छा किया। विकास के लिए जरुरी था लेकीन इसमे जो खर्चा हो रहा है, जिस तरीके से काम किये जा रहे है उसमे हमारी आपत्ती है। आपत्ती कैसी है की कंन्सलटंट अपॉईंट कीया गया था अभी कल इसका जो हेडींग है। इसमे बर्नड साहब को बोला आपको आपत्ती है तो आप जाके से कंन्संल्ट किया करो मे साहब के पास कल गया था। इसमे जो हेडींग दिये थे वह ओडी सर्व्हे, फुटबॉल ग्राऊंड, ट्राफीक काऊंट या वॉल्क हायर जो हेडींग पे खर्चा किया गया है मैने खांबित साहब से पुछा यह सब क्या क्या चीज है और मुझे कहना चाहिए। खांबित साहब ने बुरा नही मानना चाहीए की, उन्होंने स्विकार किया की, उन्हे इसके ज्यादा जानकारी नही है अभी फॉर एक्झांम्पल मै बोलता हूँ, इसमे लिखा है फुट पोल काऊंट ८ घंटे के अंदर एक आदमी खडा रहेगा उस एरीये से कितने लोग गुजरते है यह काऊंट करने का है और उसका ८ घंटे का १० हजार रुपया लिखा गया है। जब की यह काम ५००-६०० मे लेबर कर सकता है। खांबित साहब बोले इसकी मॅथोलॉजी अलग हो सकती है। तो क्या कॅमेरा रेकॉर्डींग करेंगे, सीसी रेकॉर्डींग करेंगे तो इसमे १०००० खर्चा कैसा आ रहा है उसका स्पष्टीकरण नही मिला। ट्रॅफिक का काऊंट लिखा है। कितनी गाडी आयेगी जायेगी ८ घंटे मे पर लोकेशन अभी ८ घंटे खडा होके गाडी कितनी आयेगी जायेगी यह काऊंट करने के लिए ३५००० रुपया दिया गया है। मैने बोला की साहब मै खडा हो जाता हूँ मुझे मिलता तो खांबित साहब बोले आप टेंडर ले लेते है जबकी इनको मालुम है टेंडर लेने के लिए टर्नओव्हर की जरुरत लगती है एक्सपीरीयंन्स चाहीए। लेकीन जो गलत हो रहा है वो बोलना तुम्हारा अधिकार है। आप अगर करोगे तो बहोत अच्छी बात है खर्चा कम हो जायेगा। लेकीन ६ लोकेशन का करना जरुरी है या ० लोकेशन का जरुरी है? यह कॉन्सेप्ट कैसे आयेगा यह मालुम नही पड रहा है। उसके बाद मे ओजी सर्व्हे किया आऊट डोअर सर्व्हे लिखा है तो आऊट डोअर सर्व्हे पे क्या आयेगा? सब चीज तो आ गई। फुट काऊंट आ गया ट्रॅफिक काऊंट आ गया। आ गई मॅप लॅन्डींग आ गया। मॅप सर्व्हे आ गया। एक एक चीज आ गई। प्रिंटींग के कागज आ गये, पैसा आ गया। आऊट ऑफ पॉकेट एक्सपेन्स भी इसके अंदर लिख गया की कई आपको खर्चा करना पडे देने लेने का तो वो भी खर्चा उसका अलग से देना पडेगा वो भी उसमे लिखा है। यानी कन्सलटंट को खुले हात से पैसा देने को तयार है दुसरी बात, जब टेंडर प्रक्रिया ली जाती है तो उसमे पहले टेंडर इन्वाईट करते है फिर हमे वाटाघाटी करनेका अधिकार देते है। अभी वाटाघाटी करने के बारे मे बताता हूँ जैसे लॅपटॉप के बारे मे बात हुआ था और जहाँतक मेरी जानकारी है की, बाद मे कमिशनर ने इंटरेस्ट लेके उसको रेट कम करवाया ये वाटाघाटी आप तभी करवा सकते हो जब आपको कंम्पेटीव्ह नॉलेज हो की यह काम बाकी लोग कैसे करते है। मैने साहब से पुछा की, आने इस चीज का कंन्सलटंट जो आया इसको आपने किसी कंम्पेरीटीव्ह ऑथोरीटी के टेंडर से कंम्पेअर किया क्या? मुझे स्पष्ट जबाब मिला नही तो आप इसको वाटाघाटी कैसे करवा सकते है। कहने का मतलब हमने यह काम कंन्सलटंट को दे दिया आज वो अगर १० करोड लेता है या ५ करोड लेता है हमे मालुम ही नही हमे कितना दे रहे है इसलिए मेरी सुचना यह है की, इसका रितसर स्टडी की जाए स्टडी करके इस प्रस्ताव को पुनः लाया जा जाये और जैसे प्रोजेक्ट के अंदर आपने बॉम्बेका, मेट्रोका देखा होगा। जब भी ऐसी ऐसी प्रोजेक्ट चलती रहती है, स्टँडींग कमिटी के अंदर वहाँ के कन्सलटंट वहाँ के प्रोजेक्ट, वहाँपर करनेवाले वो लोग बाकायदा टी.व्ही. के उपर दिखाते है की, यह आऊट डोअर सर्व्हे होगा, यह फुटबॉल होगा ऐसा होगा, हमको समज मे आये की, हम किस चीज का कैसे दे रहे है। अभी बिलकुल अज्ञान मे आँख बंद करके जो कंन्सलटंट ने दिया टेंडर्स आया उसको देना उचित नही है ऐसा मेरा अभिप्राय है। धन्यवाद।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहब आपण एम.एम.आर.डी.ए. कडे प्रोजेक्ट वगैरे पाठवलं का?

**दिपक खांबित :-**

हो.

**शरद पाटील :-**

आज एवढा मोठा खर्च आहे एम.एम.आर.डी.ए. कडे पाठवलं एम.एम.आर.डी.ए. प्रस्तावाला उत्तर वगैरे काय दिलं का?

**दिपक खांबित :-**

एम.एम.आर.डी.ए.कडे गेल्या चार वर्षापासुन फॉलो अप करतो.

**शरद पाटील :-**

त्यांच म्हणणं काय आहे?

**दिपक खांबित :-**

त्यांच एक पत्र आलेलं आहे की, हे तुमचं इंटरनल काम आहे म्हणुन हे जे ब्रिजेस आहे हा रस्ता जो आहे हा तुमचा अंतर्गत वाहतुकीचा मार्ग आहे.

**रोहिदास पाटील :-**

खांबित साहेब, आम्ही तुम्हाला गेल्यावेळी यातला निधी तुम्ही दुसऱ्या ठिकाणी फिरवला. त्यावेळी मी डॉक्युमेंट सहित सांगितलं की, एम.एम.आर.डी.ए.चं मला पत्र आहे की, हे रस्ते ह्याच्यामध्ये बसणार नाही.

एमएमआरडीए ह्याच्यावर खर्च करु इच्छित नाही तरी तुम्ही आम्हाला सांगितलं की, ह्याच्यासाठी प्रयत्न सुरु आहे. आता तुमची खात्री पटली का? की, एमएमआरडीए करणारचं नही तो निधी परत इकडे फिरवायला लागेल.

**दिपक खांबित :-**

करणार नाही असं नाही.

**रोहिदास पाटील :-**

आता ह्याच्या दोन गोष्टी झाल्या ह्या हेडसाठी आपण ठेवलेला निधी तुम्ही फिरवला आता परत तुम्ही ह्याच्यासाठी मंजुरी घेता मंजुरी घेऊन परत निधी लागणारच ना तर त्या निधीमधुन तुम्ही काय करणार?

**दिपक खांबित :-**

साहेब, पहिला आपण एमएमआरडीएशी पुन्हा एकदा कंन्फर्म करणार त्यानंतर जाऊन ह्या कंन्सलटंट ला वॉर्डर देणार त्याच्याकडुन तो सर्व्हे होऊन जवळ जवळ चार महिने लागतील. त्याला टाईम पिरेड विचारलं की, सगळं सर्व्हे होऊन डीपीआर होऊन तो चार महिन्यात आपल्याला इस्टीमेट देईल. त्यानंतर तो आपण मा. महासभेमध्ये आणणार पुढच्या बजेटला तरतुद करुन मार्च किंवा एप्रिलच्या मिटींगमध्ये तो आणणर की, ह्याला एवढा खर्च आहे तो कशापासून करायचा? आपण करायचा की, कुठल्या गव्हर्नमेंट, सेंट्रल गव्हर्नमेंट, स्टेट गव्हर्नमेंट च्या स्किममध्ये टाकायचा? तर ह्याला यायला चार महिने लागतील. त्यामुळे खर्च लेखाशिर्ष वर पडणारच नाही परत ह्याच्यात असं ही आहे. हा जो तांत्रिक सल्लागार आहे तो जो प्रोजेक्ट रिपोर्ट करेल तो प्रोजेक्ट रिपोर्ट आपण आयआयटी कडुन तपासून घेणार आहोत की हा जो केलेला आहे. प्रुफ चेक त्याचा तो बरोबर आहे की नाही त्यानंतर पुढची कारवाई करणार अशाच प्रकारे आपण कुठलीही गोष्ट आयआयटी कडुन तपासून घेऊनच पुढची कारवाई करतो. त्याशिवाय आपण त्याला पेमेंट देणार नाही.

**शरद पाटील :-**

नियोजन समितीमध्ये आमची एक सदस्य आहे. नयना वसानी म्हणून त्यांनी हा विषय तिथे मांडला आहे आणि त्याच्यावर पालक मंत्र्यांच पत्र सुध्दा आहे ते मी वाचून दाखवतो (पत्राचे वाचन केले) तर आपण तिथे सुध्दा प्रस्ताव पाठवून बघा ना जर होत असेल.

**दिपक खांबित :-**

पाठवलेलं.

**शरद पाटील :-**

मग तिकडुन उत्तर वगैरे काय आले?

**दिपक खांबित :-**

काही उत्तर नाही आलं.

**शरद पाटील :-**

आणि आपण हे कंन्सलटंटला किती ब्रिज बांधणार होते ते? ते भुयारी बांधणार आहोत का?

**दिपक खांबित :-**

८ नाही साहेब, पण सुचविलेल्या ठिकाणी पादचारी मार्ग पाहिजे. आणि त्याठिकाणी ओव्हरब्रीज पाहिजे आता ते रिपोर्टप्रमाणे आहे. सर्व्हे करुन तिकडे काही ठिकाणी अंडरग्राऊंड पण आहे. काही ठिकाणी तोच रिपोर्ट आहे. त्या रिपोर्ट वरील तोच सांगेल. आपण जे बोलतो त्याप्रमाणे तिथे ओव्हर ब्रिज बांधायचे आहे हा जो रिपोर्ट देईल त्याप्रमाणे आहे आपण काही सांगु शकत नाही.

**शरद पाटील :-**

कुठे भुयारी मार्ग येऊ शकतो कुठे पादचारी मार्ग सुध्दा येऊ शकतो.

**दिपक खांबित :-**

हो. आता गोल्डन नेस्टला आहे. आपण म्हणतो की, तिकडे लोकांना उतरण्याकरीता क्रॉस करण्याकरीता ब्रिज बांधा जसं रेल्वेचा आहे तसा त्याच्या बदल्यात तो खाली पण करु शकेल की, हा तुम्हाला खर्चिक पडेल त्यासाठी तुम्ही खालुन करा.

**शरद पाटील :-**

महानगरपालिकेतील मुख्य रस्ता छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) ) या रस्त्यास पादचारी/भूयारी मार्ग (Pedestrian Grade Separators/Subways Projects) बांधणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तांत्रिक सल्लागार नेमणूक करणेकामी बांधकाम विभागाने निविदा मान्यतेस सदर विषय या सभेपुढे ठेवलेला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर आठ ब्रिजेस/भुयारी मार्ग बांधण्यात येणार असल्याचे बांधकाम विभागाचे म्हणणे आहे. या ठिकाणी असे नमुद करण्यात येते की, आठ ब्रिजेस/भुयारी मार्ग बांधण्याकरीता वेगवेगळा प्रकल्प अहवाल बांधकाम विभागाने तयार करण्याची आवश्यकता नाही. बांधकाम विभागाने एक ब्रिज/भुयारी मार्गाचे डिझाईन, स्ट्रक्चरल प्लान व तांत्रिक बाबी तयार करून प्रकल्प अहवाल तयार करावा. व हाच अहवाल इतर ठिकाणी येणारे ब्रिज/भुयारी मार्ग यांच्याकरीता उपयोगात आणावा. यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या ब्रिज/भुयारी मार्ग तयार करण्याच्या प्रकल्प अहवालाच्या खर्चामध्ये बचत होणार आहे. पर्यायाने महानगरपालिकेस जास्तीची फी ठेकेदारास प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी द्यावी लागणार नाही.

तरी बांधकाम विभागाने छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर आठ पादचारी/भूयारी मार्गावर बांधण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तांत्रिक सल्लागार न नेमता, बांधकाम विभागाने सुचविल्याप्रमाणे या तांत्रिक सल्लागाराकडून एकाच ब्रिजचे/भुयारी मार्गाचे सर्वसाधारण स्ट्रक्चरल प्लान, डिझाईन व तांत्रिक बाबीचा प्रकल्प अहवाल तयार करून घ्यावा. या तयार होणाऱ्या (स्ट्रक्चरल प्लान, डिझाईन व तांत्रिक बाबी) अहवालाप्रमाणे इतर सात ब्रिज/भुयारी मार्गाचे प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेकामी निवीदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडीत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मेरा अनुमोदन है।

**नगरसचिव :-**

प्र.क्र १२६ करीता दोन ठराव आलेले आहे. पहिला ठराव दुसरा ठराव सुचक शरद पाटील अनुमोदक डॉ. राजेंद्र जैन अनुक्रमास मी दुसरा ठराव मतदानास घेतो. दुसऱ्या ठरावाचे सुचक शरद पाटील अनुमोदक डॉ. राजेंद्र जैन या पहिला ठरावाचे सुचक प्रभात पाटील, अनुमोदक अनिता पाटील या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे. ह्या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे. तटस्थ कोणी नाही.

**मा. सभापती :-**

प्रभात पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ८ मते आणि शरद पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ७ मते म्हणुन प्रभात पाटील यांनी मांडलेल्या ठराव बहुमताने मान्य करण्यात येतो.

**प्रकरण क्र. १२६ :-**

निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ११५ :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ |
| १ | **छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमीरा रोड) पादचारी / भुयारी मार्ग(Pedestrian Grade Separators / Subways projects) बांधणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे.** | दि. १८/०३/२०१३ | दै.पुढारी / दै. मिड डे दि.१७/०५/२०१३ | दि २०/५/२०१३ |

| | | | **MONARCH SURVEYORS & ENGG CONSULTANTS PVT** |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Description** | **Per Unit** | **Rate in Rs.** |
| 1 | OD Survey | 8 Hrs per Location | **20000** |
| 2 | Foot Fall Counting | 8 Hrs per Location | **10000** |
| 3 | Traffic Count | 8 Hrs per Location | **35000** |
| 4 | Detailed topographical survey with total station and L/S, C/S with auto level including carrying out detailed geographical survey taking trialpits of size 1 x 1 x 1 m at every 200m interval along the centre line of road, for strata classification showing details of permanent / semi-permanent structures, trees, telephone lines, pipe lines, field bunds cross roads upto 100 m or as directed including down loading survey data digitization and preparing plans and cross section 'L' section including introducing necessary road Geometrics working out quantities of various items in C.P. in layers 5 copy with soft copy etc. complete as director by Engineer-In-Charge area with Auto level including closing the traverse etc. complete<br>B) Plain & Rolling Country | Km | **55500** |
| 5 | Procurement of village map / forest map / land plans from | Km | **7500** |

| | | | |
|---|---|---|---|
| | forest / revenue authority for preparation of land plan record including necessary payment for the plans, other documents as required for this survey plotting and demarcation on plan etc. complete | | |
| 6 | Taking trial bores 150 mm (6" soft strata) dia in soft strata and in soft rock including all materials such as casing pipes and accessories oil grease steel balls and such materials as required (including conveying the materials and machineries to site of work) preserving the loose samples serially in glass / plastic jar on site of work and conveying the same to H Q of concerned office as directed including SPT test & supply | RM | **8500** |
| 7 | Taking trial bores 76.20 mm (3") 0 for 50.80 mm (2) core in by diamond drilling machine with "Nx Bit" with double tube core barel system including preservation of core in standard core boxes etc. complete with testing & result | RM | **1500** |
| 8 | Providing trun tappa core boxes of jungle wood of size 1.25 M x 0.15 M for preserving core samples with all fixtures and fastening handles locking arrangement etc complete | No. | **1500** |
| 9 | Preparation of area contour plans and marking road levels on it in Geographical Information System (GIS) format in UTM WGS 84 grid format | Lump Sum | **27500** |
| 10 | Preparation of rendered 3d digital elevation model existing and proposed cross sections in UTM WGS 84 grid format | Lump Sum | **27500** |
| 11 | Generation & Printing of reports, | | |
| | A 4 | Per page | **20** |
| | A3 | Per page | **38** |
| | A 2 | Per page | **69** |
| | A1 | Per page | **101** |
| | A 0 | Per page | **186** |
| | A 00 | Per page | **230** |
| 12 | Scanning of Reports & Maps | | |
| | A 4 | Per page | **20** |
| | A3 | Per page | **38** |
| | A 2 | Per page | **69** |
| | A1 | Per page | **101** |
| | A 0 | Per page | **186** |
| | A 00 | Per page | **230** |
| 13 | Data entry & creation of data base | Per field | **50** |
| 14 | Taking photographs of site/ properties etc in digital format and supplied in database in jpg format with VGA resolution | Per no. | **50** |
| 15 | Preparation of Walk Through, VR2 or higher resolution | Per Minute | **70000** |

| SN | Description of item | Fee (as percentage of Project cost as approved by MBMC from time to time) | |
|---|---|---|---|
| | | In figures | In words |
| 1 | Providing assistance in preparation of Feasibility Report and Detailed Project Reports (DPR) including write-ups, designs and estimates of the project | **1.450000** | **One point Forty Five Percent** |
| 2 | Providing services for preparation of tender documents and Bid process management of the projects for 'MBMC' | **0.250000** | **Zero Point Twenty Five Percent** |
| 3 | Functioning as Project Management Consultant & technical auditor of 'MBMC' for project execution. | **2.000000** | **Two Percent** |
| | **Total contract charges** (as percentage of total project cost including professional charges, other expenses, out of pocket expenses, traveling cost & taxes applicable on date of the submission of proposal except service tax and related payments as per Service Tax Rules | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 2011 or any other tax substituting Service Tax, and value added tax whichever tax shall be paid extra as applicable on date and shall be over and above the bid price) | | |

वरील कामी **मे. मोनार्च सर्व्हेअर्स ॲण्ड इंजिनिअर्स कंन्सल्टंटस् प्रा.लि.** यांनी **वरील दराची** निविदा सादर केलेली आहे. सदर निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. वरील प्रमाणे दराप्रमाणे प्रत्यक्षात आवश्यकतेनूसार सल्लागारास काम करण्याबाबत कळवावे. सल्लागाराने सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केल्यावर आय. आय. टी. मार्फत तपासणी (Proof Check) करुन घ्यावीत व तद्नंतरच सदर कन्सल्टंटचे देयक अदा करावे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

| ठरावाच्या बाजूने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्री. राजू भोईर<br>२) श्रीम. अनिता जयवंत पाटील<br>३) श्री. मुन्ना सिंह<br>४) श्रीम. शर्मिला बगाजी<br>५) श्रीम. वंदना मंगेश पाटील<br>६) श्री. परशुराम म्हात्रे<br>७) श्री. हंसुकुमार पांडे<br>८) सौ. प्रभात प्रकाश पाटील | १) श्री. शरद केशव पाटील<br>२) श्री. रोहिदास पाटील<br>३) श्रीम. मिरादेवी यादव<br>४) डॉ. राजेंद्र जैन<br>५) श्री. प्रशांत दळवी<br>६) सौ. मंदाकिनी गावंड<br>७) श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | निरंक |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२७, निविदांना मान्यता देणे. (एम.एस.सी.आय.टी.) (महिला व बालकल्याण विभाग) (दि. २९/१०/२०१३ रोजीच्या सभेमध्ये सुचविलेल्या सुचनेनुसार)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय महिला बाल कल्याण द्वारा जो एमएससीआयटी का प्रस्ताव लाया है उस विषय मे मेरी सुचना है।

**प्रभात पाटील :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षणासाठी E-Tendering द्वारे व खबरे आज तक या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण घटकाअंतर्गत ९५ लाख तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सदर एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षणासाठी सन २०१३-१४ पर्यंत रु. १० लाख खर्च करण्यास मंजूरी देत आहे. सदर प्रशिक्षणासाठी मार्च २०१५ पर्यंत मंजूरी देत आहे. सदर प्रशिक्षणासाठी खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नांव | (E-Tendering) ठेकेदाराने सादर केलेले |
|---|---|---|---|
| १ | एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण | सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट | २७५०/- |
| २ | | ओम साई कॉम्प्युटर | २८५०/- |
| ३ | | युनिकॉन कॉम्प्युटर एज्युकेशन | २९५०/- |

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार कमी दराची निविदा सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट यांची रु. २७५०/- ची प्रति लाभार्थीच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**अनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

याची प्रत देणार की नाही तुम्ही काय करणार ते?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, ह्याच्या अगोदर दिला होता आपण पण ते नेक्स्ट टाईमला घ्या म्हणुन सांगितलं होतं. आपलीच सुचना होती. पहिला दिली होती त्यावेळी आपण सांगितलं रितसर घेऊन या.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब सुचना है वो मै पढता हूँ। ज्या ठेकेदारांना प्रशिक्षण देण्याचे काम देण्यात आलेले आहे. त्यांच्याकडे स्वतःच्या कार्यालयात फी देऊन शिकणारे खाजगी विद्यार्थी सुध्दा असतात. ठेकेदार मनपाच्या प्रशिक्षणामध्ये खाजगी विद्यार्थ्यांचा समावेश करुन बोगस बिलाची रक्कम वसुल करत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे गरजू नागरीकांना याचा फायदा घेता येत नाही. यामुळे मी आपणांस अशी सुचना करतो की, गरजू नागरीकांची नावाची छाननी करुन यादी प्रसिध्द करण्यात करावी व त्यानंतर सर्व प्रशिक्षण घेणाऱ्यांचे आयुक्त / सक्षम अधिकरी बरोबर एक फोटो काढून त्याचवेळी सर्व प्रशिक्षण घेणाऱ्यांकडून ॲफीडेव्हीट करुन घेण्यात यावे की, मनपाकडून त्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

फोटोचं तुम्ही काय म्हणाले?

**शरद पाटील :-**

प्रशिक्षण झाल्यानंतर

**प्रभात पाटील :-**

आयुक्त के साथ इतके प्रशिक्षणार्थी के साथ हर एक का................

**डॉ. राजेंद्र जैन :-**

क्या होता है मॅडम मै बताता हूँ।

**प्रभात पाटील :-**

आपकी बात मै समझ गई लेकीन हर एक प्रशिक्षणार्थी कमिशनर इतना टाईम देंगे क्या?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

इकठ्ठा करेंगे बॅच बनायेंगे और बॅच के अंदर हर एक की फोटो होती है कर लेंगे और वहाँपे लिखा जायेगा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आयुक्त साहेब प्रत्येक ठिकाणी येणार नाही.

**प्रभात पाटील :-**

डीएमसी घ्या ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सक्षम अधिकारी करतो.

**रोहिदास पाटील :-**

सक्षम अधिकाऱ्यांची सही व्हावी अशी दुरुस्ती करा ही सुचना चांगली आहे.

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव मंजुर करण्यात येते.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी सभागृहाचं लक्ष वेधतो. आता आपले मैदान जे असतात त्या मैदानाची देखभाल कोणी करावी? आरोग्य विभागाने करायची, वृक्षप्राधिकारणाने करायची, बांधकाम ने करायची, कोणी करायची? एखादं मैदान चालू आहे अनेक वर्ष झालं मैदान वापरतात त्याला जबाबदार कोण? तिथे व्यवस्था बघणार कोण?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वृक्षप्राधिकरण बघणार.

**रोहिदास पाटील :-**

संडास, मुतारी कोण बघेल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साफसफाईचं आम्ही बघतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही बघणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला सांगतो सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये असल्या संडासामध्ये आपल्यापैकी कोणीही जाऊ शकणार नाही काय अवस्था आहे? आपल्याकडे पैसा नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सॉल्ट ठिकाणी बांधुन देत नाही. २-३ वेळा आम्ही प्रयत्न केला. आम्ही बांधलं पण होतं पण सॉल्ट डिपार्टमेंट ने तोडले पुन्हा आम्ही ३-४ वेळा पत्र दिलं.

**रोहिदास पाटील :-**

जे असेल ते तरी साफसफाई ठेवणार की नाही? त्याच्यात पाणी नाही इतकी मुलं खेळतात त्याला पाणी प्यायला नाही आणि जी टाकी आहे त्याच्यामध्ये तुम्ही गावात कुठे लारवा शोधता तिथे जा त्या टाकीमध्ये किती लारवा आहे ते पाणी ती पोरं पितात हि महापालिकेची दैन अवस्था आहे ते कोण बघेल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते फिरते शौचालय आहे.

**रोहिदास पाटील :-**

आणि पाणी शुध्द मिळायला पाहिजे मुलांना पाणी मिळायला पाहिजे ते कोण बघेल. उत्तर द्या आता ही सभा संपल्यानंतर काका तिकडे ते ॲक्टीव्ह होईल त्याच्यावर कारवाई होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

लगेच होईल साफसफाई केली की नाही ते बघतो मी पाणी दुषित आहे का ते पण बघायला सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

संडास, मुतारी, पाणी, पाण्यासाठी एक कनेक्शन द्याना पाणी कमी पडत असेल तर मुलांना पाणी तर मिळू दे. आता सगळ्या शाळांचे वार्षिक महोत्सव सुरु झाले. संपूर्ण मैदान बुक असते. तिथे आपलं काहीच नसते दुसरं मैदान पावसाळ्यामध्ये ट्रॅक्टर वगैरे फिरले सगळे खड्डे झाले त्याची लेव्हलींग कोण करणार? २ तारखेला तिथे मोठे सामने आहेत त्याच्याआधी मैदान नीट लेव्हल होईल का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इरकर तिथलं लेव्हलींग करुन घ्या. वृक्षप्राधिकरण सगळी मैदानं व्यवस्थित करुन घ्या ना. कारण, आता सिजन सुरु झाला आहे. गॅदरींग च्या लोकांचा पिरेड सुरु झाला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तिथे खेळाचं खो-खो चं मैदान नाही कबड्डीचं मैदान नाही बॅडमिंटनचं मैदान नाही खांबे लावा ना खांबे लावायला किती पैसे लागतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते करणं गरजेचं आहे. तिथे खो खो व्हायला पाहिजे, व्हॉलीबॉलचं पण व्हायला पाहिजे. थोडं थोडं प्रत्येकाला वाटून घ्या थोडा एरिया वाटून सगळ्या खेळांना समाविष्ट करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

सगळे खांबे नीट लागले असतील मैदान विकसीत झाले असतील अशी अपेक्षा करतो.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, गेल्या वर्षभरापासून आपण इकडे चर्चा करतो. अनधिकृत मोबाईल टॉवर आज आपलं महसुल उत्पन्नात दोन करोड रुपयांचं नुकसान होते. पालिकेच्या ज्या ९५ पूर्वीच्या ज्या इमारती आहेत त्या इमारतींवर अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले आहे तोही इकडे एक मिरा भाईंदरच्या रहिवासियांच्या जीवाला धोका आहे आणि अश परिस्थीतीत गेल्या १० वर्ष १६५ मोबाईल टॉवर अनधिकृत आहेत. अशाप्रकारची लिस्ट माझ्याकडे देण्यात आलेली आहे. गेले १० वर्षापासुन ह्याचा पाठपूरावा करतो ही कोर्टामध्ये केस आहे असं सांगुन उत्तर देताना नेमकं कारण काय? आपण रुलींग द्या. तातडीने ह्याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

**मा. सभापती :-**

अजुन काही असेल तर बोला.

**प्रशांत दळवी :-**

तोच प्रश्न आहे त्याचा खुलासा द्यावा ना. गेल्या १० वर्षापासुन हे अनधिकृत टॉवर उभारले गेलेत. नामांकित ५-६ कंपनीचे टॉवर तिथे उभारले आहेत आपल्या शहरामध्ये...............

**मा. सभापती :-**

प्रशासनाने खुलासा करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, एका ठिकाणी डिमोलेशन ठेवलेलं आहे त्यामुळे अतिक्रमण विभागाचं सध्या इथे कोणी उपलब्ध नाही ह्याची माहिती पुढच्या सभेत देऊ तुम्हाला.

**प्रशांत दळवी :-**

आयुक्त साहेब कुठला विषय आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

टॉवरच्या संदर्भात.

**प्रशांत दळवी :-**

ह्याच्यात डिमोलेशनचा काय संबंध? बिल्डींग डिमोलेशन करणार की, टॉवर डिमोलेशन करणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आज कोणीही ऑफीसर उपलब्ध नाही. सुचना चांगली आहे. पुढच्या सभेस पूर्ण माहिती घेऊन तुम्हाला सांगतो.

**प्रशांत दळवी :-**

मला माहिती नको मी माहिती घेतलेली आहे. आपण अनधिकृत मोबाईल टॉवरवर कारवाई काय करणार आहात?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एक्झॅक्ट पोजिशन माहित नाही काय आहे, स्टे आहे का हायकोर्टमध्ये पिटीशन चालु आहे असं काहीतरी आहे ह्याची सगळी माहिती घेऊनच सांगावं लागते.

**प्रशांत दळवी :-**

विधी विभाग आहे ना त्यांना विचारा ना.

**शरद पाटील :-**

आपल्या महापालिकेत कसल्याचं माहिती नसतात का कोणाकडे? हा नविन विषय आहे का? वर्षभर चाललेला आहे तो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अद्यावत माहिती द्यायला पाहिजे चुकीची माहिती नको आपल्याला.

**शरद पाटील :-**

चुकीची माहिती नको पण तुम्ही ठेवत नाही ना पण तो नविन विषय आहे का?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर मला प्रश्न परत एकदा रिपीट केला तर सांगता येईल मला.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये नामांकित कंपन्यांचे १६५ टॉवर अनधिकृत आहेत गेल्या १० वर्षापासुन त्याबाबतीत विधी विभागाकडे हायकोर्टामध्ये मॅटर आहे अशा पध्दतीचं लेटर माझ्याकडे आहे तर नेमकं कारण काय?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते, मोबाईल टॉवर्स च्या संदर्भामध्ये २०१२ पासून ते २०१३ पर्यंत ७-८ रिपीटेशन दाखल झालेल्या आहेत. आता रिसेंटली हायकोर्टाने एक डिसीजन असा दिलेला आहे की, मोबाईल टॉवरच्या संदर्भात जो आपण ठराव पारित केला होता मा. महासभेमध्ये तो ठराव आणि स्टेट गव्हर्नमेंटची मोबाईल टॉवर संदर्भात पारित करण्यात आलेली पॉलिसी आहे त्यात विसंगती आहे जो पर्यंत तुमची पॉलिसी फ्रेम होत नाही कारवाई करण उचित होणार नाही.

**प्रशांत दळवी :-**

ही पॉलिसी तयार कधी झाली?

**रोहिदास पाटील :-**

पॉलिसी कोण फिक्स करणार? महापालिका की शासन?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

स्टेट गव्हर्नमेंट.

**रोहिदास पाटील :-**

तोपर्यंत आपण काही करायचचं नाही? कुठेही कोणीही टॉवर लावलं तर चालेल?

**प्रभात पाटील :-**

स्टेट गव्हर्नमेंटची पॉलिसी फिक्स आहे असं म्हणालात ना तुम्ही.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

अजुन ते फायनली फ्रेम झालेली नाही जी ड्राफ्ट स्टेट गव्हर्नमेंटची पॉलिसी रेकॉर्ड वर आलेली आहे आणि आपला जो ठराव आहे त्याला विसंगती आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण कोणतं मेंन्टेन करणार? महाराष्ट्र शासनाचं करणार की आपलं करणार? तुम्ही आपलही करत नाही त्यांचही करत नाही. तुमचं चुकीचं झालं असं तुमच्यावर कोणी आरोप केला आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

कोर्टाने

**रोहिदास पाटील :-**

कुठे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हायकोर्टाने ऑर्डर पास केली.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेतले तुम्ही अनधिकृत चार टॉवर काढले आणि तुमच्यावर केस झाली असं कोणती केस आहे? आहेच नाही.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

आहेत ना बऱ्याच केसेस आहेत तिथेच ७-८ केसेस दाखल झाल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

कोणाच्या?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मोबाईल टॉवरच्या.

**रोहिदास पाटील :-**

सोसायटीच्या की, टॉवर्स वाल्यांच्या?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मोबाईल टॉवर्स.

**प्रशांत दळवी :-**

आपण दाखल केले की त्यांनी आपल्यावर केल्या?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मोबाईल टॉवर्स कंपनीने आपल्या विरुध्द केलेले रिट्स आहेत.

**प्रशांत दळवी :-**

होऊ द्या ना दाखल मा. सभापती महोदय आज लोकांच्या जिवितांचा प्रश्न आहे. गेले १० वर्ष आपण त्यांच्या विरोधात लढतो हे अनधिकृत टॉवर्स १६५ आपल्या शहरामध्ये उभारले.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर हायकोर्टाच्या ऑर्डर्सप्रमाणे काही अनधिकृत मोबाईल टॉवर्स आहेत त्याच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम कधी करणार कारवाई? १० वर्षभर कारवाई आपण प्रस्तावित करतो. हे गेल्या १० वर्षाचा रेकॉर्ड आहे १६५ अनधिकृत मोबाईल टॉवर.

**रोहिदास पाटील :-**

दोन विषय आहेत तुम्ही चुकून किंवा अपूऱ्या माहितीवर त्याला परवानगी दिली हा विषय वेगळा पण ज्यांनी तुमच्याकडुन परवानगी घेतलीच नाही त्यांना काढायला काय हरकत आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ज्यांनी परवानगी घेतलेलीच नाही त्याच्यावर कारवाई चालु आहे.

**रोहिदास पाटील :-**

कुठे चालु आहे? एक पण पेपरमध्ये आलं नाही वाचून दाखवावं कोणी सांगावं की............

**शरद पाटील :-**

कुठच्या काढलं ते दाखवा ना?

**रोहिदास पाटील :-**

ज्यांना तुम्ही चुकून परवानगी दिली.............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो त्या विभागाचे अधिकारी उपस्थित नाही.

**शरद पाटील :-**

नाही तर तुम्ही बोलवून घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पुढच्या वेळेस सभेत माहिती देतो ना. पहिला विषय हा घेऊया.

**रोहिदास पाटील :-**

ह्या सभेचा आग्रह आहे ज्यांना तुम्ही चुकून कशी परवानगी दिली असेल तो विषय वेगळा महापालिकेला विचारलचं नाही. तुम्हाला कोण काऊंट करतच नाही. आम्हाला नाही तुम्हाला नाही. आणि त्याचे टॉवर्स चालू आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करु शकतो की नाही हा विषय आहे आमचं मत आहे करु शकतो. किती दिवसात, किती लोकांवर करणार? ते पुढच्या मिटींगमध्ये सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नक्की.

**शरद पाटील :-**

तुम्ही इथे बसलात ना. तुम्ही आम्हाला काय बोलले की प्रत घेऊन यायला पाहिजे होती ना तुम्ही जबाबदार इथे बसता तर तुम्ही आम्हाला ह्याचं उत्तर द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हेच उत्तर आहे माझं. पुढच्या वेळी माहिती देतो.

**रोहिदास पाटील :-**

ज्यांनी परवानगी घेतलेली नाही, त्याच्यावर संध्याकाळी कारवाई होईल असं तुमचं रुलींग आणि केलेल्या कारवाई बद्दल पुढच्या मिटींगमध्ये माहिती द्यायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आज ऑलरेडी डिमोलेशन आहे.

**प्रभात पाटील :-**

महापालिकेमध्ये डिमोलेशन होतं ही नविन गोष्ट आहे आणि मला असं वाटते की, महापालिकेचं अभिनंदन केलं पाहिजे की डिमोलेशन होते.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय फार गंभीर विषय आहे. या विषयाकडे लक्ष द्या हे लोक आपल्या मिरा भाईंदर शहराला वेठीस धरतात. गेल्या १० वर्षापासुन कोर्टामध्ये मॅटर आहे सांगुन गेले १० वर्ष हे नामांकित कंपनीचे टॉवर इथे अनधिकृत उभारले आहेत. ज्या सोसायटीने छपरा लावल्यात त्या सोसायटींना नोटीस जाते. त्या सोसायटीची परवानगी घेतलेली आहे का? आणि त्या सोसायटी आणि त्यांच्या मिली भगत असुन............

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, या महापालिकेत असाच विषय आहे एखाद्या गरीबाची भिंत तोडायची असेल ना तर ताबडतोब आपले अधिकारी जातात आणि आपण एखाद्या मोठ्या कामाची तक्रार करतो ना ते होत नाही. मग त्याला वेळ देणार त्याला नोटीस देणार त्याला स्टे आणायला सांगणार.

**प्रशांत दळवी :-**

इमारतीचा पूर्ण एक भाग त्या टॉवरनी व्यापला गेला आहे. त्या टॉवरमुळे रेडीएशनमुळे लोकांच्या जिवीताला धोका आहे आणि अशा परिस्थीतीत महानगरपालिका प्रशासन त्यांना गेले १० वर्षभर परवानगी देते आणि निर्लज्जासारखे म्हणतात, १० वर्ष त्यांची केस कोर्टामध्ये पेंडींग आहे. आपण कारवाई करु शकत नाही. परवानगी दिलेली नाही तर तुम्ही कारवाईची कशाला वाट बघता? आपल्या विरोधात पिटीशन फाईल होऊ द्या. मा. सभापती महोदय कठोर निर्णय घ्या ह्याची कारवाई झाली पाहिजे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, अशा प्रकारची जी काही अनधिकृत टॉवर्स असतील त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असे मी आपल्याला आदेश देतो.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझा विषय असा आहे की, आपल्या शहरामध्ये लग्नाचे हॉल किती? हे शहर एवढं मोठं वाढत चाललेलं आहे. या शहरामध्ये लग्नासाठी हॉल आपल्या महापालिकेचे किती आहे?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो मिळकत विभागाचा उपायुक्त म्हणुन आताच कामकाज दिलेलं आहे त्यासाठी एक लिपिकाची नियुक्ती केलेली आहे परंतु, सध्या माझ्याकडे ती माहिती उपलब्ध नाही जी माहिती असेल ती पुढच्या सभेमध्ये देतो किती हॉल आहेत सन्मा. सदस्यांनी प्रश्न विचारल्यानुसार पूढच्या सभेमध्ये सांगतो.

**शरद पाटील :-**

अंदाजित तरी सांगा ना किती आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हा सार्व. बांधकाम विभाग होता. खांबित साहेब माहिती सांगतील.

**रोहिदास पाटील :-**

कुरळेकर साहेब, तुम्ही ह्याचं प्रिंट काढा. ह्या ह्या प्रभागामध्ये ह्या ॲड्रेसवर इतक्या स्वे.फि.चा असा असा हॉल आहे. ह्या सुविधा आहे हे लोकांपर्यंत पोहचलं पाहिजे की नाही त्याचं पत्रक काढा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपल्याला सर्व लेखी देतो कुठल्या कुठल्या मालमत्ता आहेत त्याची सर्व यादीच तुम्हाला देतो.

**शरद पाटील :-**

किती गोष्टीच्या माहिती पुढच्या मिटींगमध्ये आपण देणार आता अजुन ४ विषय काढतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काढा ना प्रशासन इथे बसलेलं आहे.

**शरद पाटील :-**

त्याला पण तुम्ही असंच सांगाल पुढच्या वेळी माहिती देतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

शक्य असेल तर आता देवू. नाहीतर पूढे देवू.

**शरद पाटील :-**

मग तोच विषय झाला ना. मग विचारायचे काय तुम्हाला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आयत्या वेळेस माहिती देणे अभिप्रेत नाही. जे गोषवाऱ्याचे विषय आहे. प्रशासनाकडे माहिती आहे आणि प्रशासन तयार करते. सगळ्याच गोष्टी सांगणे शक्य नाही.

**प्रशांत दळवी :-**

कुरळेकर साहेब, आपले अधिकारी ऐकत नाही का? अधिकारी संबंधीत जे काही व्यावयायिक आहेत त्यांना पाठीशी घालता. हे जे होर्डींग्स बॅनर वगैरे आहेत त्या बाबतीत...............

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. आयुक्त महोदयांनी मागच्या आठवड्यात निर्देश दिले होते. फ्लॅक्स बॅनर्सवर कारवाई करायची. त्या अनुषंगाने माझ्या जाहिरात विभागाचे ९ कर्मचारी आहेत त्यांच्यामार्फत शुक्रवारी कारवाई केली. नंतर सोमवार आणि मंगळवार २५-२६ तारखेला अनधिकृत बांधकाम, फेरीवाले या सगळ्या वॉर्डातील कर्मचारी उपलब्ध करुन २ दिवस कारवाई केलेली आहे. पुन्हा तशीच मोहिम पुढच्या आठवड्यात किंवा ह्या आठवड्यात राबवणार आहे. कारण फक्त ९ कर्मचाऱ्याच्या मार्फत पूर्ण मिरा भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रामध्ये कारवाई करणे शक्य होणार नाही.

**प्रशांत दळवी :-**

कुरळेकर साहेब, आपल्याला मी हा विषय अगोदरही सांगितलेला. मा. महासभेत हा विषय झालेला आहे. एस्सल वर्ल्डला आपली परवानगी आहे का?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

एस्सल वर्ल्डला ज्या ४ कमानी होत्या त्यांची थकबाकी वगैरे आहे. मी महापालिकेत हजर होण्यापूर्वी तो विषय आहे. त्याबाबत त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत.

**प्रशांत दळवी :-**

साहेब मी तुम्हाला परत परत बजावतो. गेल्या दिवाळी पासुन आजही तुम्ही माझ्या बरोबर आता चला सगळे त्या ठिकाणी एस्सल वर्ल्डच्या मोठ्या मोठ्या कमानी लागलेल्या आहेत त्यांना विज पुरवठा पण आपणचं करतो मग हे कधी रात्री लावले का? दिवाळी पासून आजही तिकडे लागले गेलेले आहेत जर आपला महसुल त्यांच्याकडे बाकी आहे आपलं बिल त्याने पेड नाही केलेलं आहे त्यांनी त्यांची परवानगी घेतलेली नाही मग ह्या कमानी का काढत नाही?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

सर आजच्या आज ती कारवाई होईल परंतु ह्यापूर्वी सुध्दा सन्मा. सदस्यांनी हा प्रश्न विचारला होता त्यावेळेस ही मी कारवाई केलेली आहे.

**प्रशांत दळवी :-**

आपले अधिकारी वर्ग त्यांना पाठीशी घालतात का काढत नाही?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

वेगवेगळ्या फ्लॅक्स, बॅनर्स आहेत ते साधारण रात्री लावलेले आहे असं निदर्षनास आलेलं आहे.

**प्रशांत दळवी :-**

परत तुम्ही तोच विषय घेता, रात्री लावला दिवसा नाही लावत मग रात्री लावलेला दिवसा दिसत नाही का?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आता लावलेलं असेल तर परत .............

**मा. सभापती :-**

कारवाई कधी करणार?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आज संध्याकाळी करतो ना.

**मा. सभापती :-**

नाही झाली तर ?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आज संध्याकाळपर्यंत काढतो जिथे अनधिकृत कमानी, पॅन इंडियाचे साहेबांनी एस्सलवर्ल्डच्या विचारलेल्या त्यावर आजच्या आज कारवाई होईल.

**प्रशांत दळवी :-**

काशिमिरा पासुन येणाऱ्या आपले जे काही जेवढे मोठे मोठे होर्डींग्ज आहेत त्या होर्डींग्जवर पूर्ण लागले गेलेले आहेत.

**प्रकरण क्र १२७ :-**

निविदांना मान्यता देणे. (एम.एस.सी.आय.टी.) (महिला व बालकल्याण विभाग) (दि. २९/१०/२०१३ रोजीच्या सभेमध्ये सुचविलेल्या सुचनेनुसार)

**ठराव क्र. ११६ :-**

महिला व बालकल्याण विभागामार्फत एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षणासाठी E-Tendering द्वारे व खबरे आज तक या वर्तमान पत्रातील जाहिराती नुसार ऑन लाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण घटकाअंतर्गत ९५ लाख तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सदर

एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षणासाठी सन २०१३-१४ पर्यंत रु. १० लाख खर्च करण्यास मंजूरी देत आहे. सदर प्रशिक्षणासाठी मार्च २०१५ पर्यंत मंजूरी देत आहे. सदर प्रशिक्षणासाठी खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नांव | (E-Tendering) ठेकेदाराने सादर केलेले |
|---|---|---|---|
| १ | एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण | सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट | २७५०/- |
| २ | | ओम साई कॉम्प्युटर | २८५०/- |
| ३ | | युनिकॉन कॉम्प्युटर एज्युकेशन | २९५०/- |

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार कमी दराची निविदा सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट यांची रु. २७५०/- ची प्रति लाभार्थीच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**सदर ठरावामध्ये सन्मा. नगरसेवक डॉ. राजेंद्र जैन ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

ज्या ठेकेदारांना प्रशिक्षण देण्याचे काम देण्यात आलेले आहे. त्यांच्याकडे स्वतःच्या कार्यालयात फी देऊन शिकणारे खाजगी विद्यार्थी सुध्दा असतात. ठेकेदार मनपाच्या प्रशिक्षणामध्ये खाजगी विद्यार्थ्यांचा समावेश करुन बोगस बिलाची रक्कम वसुल करत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे गरजू नागरीकांना याचा फायदा घेता येत नाही. यामुळे मी आपणांस अशी सुचना करतो की, गरजू नागरीकांची नावाची छाननी करुन यादी प्रसिध्द करण्यात करावी व त्यानंतर सर्व प्रशिक्षण घेणाऱ्यांचे आयुक्त / सक्षम अधिकरी बरोबर एक फोटो काढून त्याचवेळी सर्व प्रशिक्षण घेणाऱ्यांकडून ॲफीडेव्हीट करुन घेण्यात यावे की, मनपाकडून त्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२८, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य साफसफाई विभाग), प्रकरण क्र. १२९, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) १) लेखनसामुग्री (स्टेशनरी) खरेदी करणे, २) विविध प्रकारची नमुने छपाई करणे व ३) बोर्ड बॅनर बनविणे व पुरवठा करणे. व प्रकरण क्र. १३०, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (वैद्यकिय विभाग)

**शरद पाटील :-**

आपण जे औषधाचे जे ड्रम असतात, डब्बे असतात हे डिस्ट्रीब्युट करतो प्रत्येक विभागाला की, आपल्या एकाच सेंट्रलाईजवरुन प्रत्येक वेळेला घेऊन जातात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एस.आय. जवळ औषध दिलेलं आहे.

**शरद पाटील :-**

देतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो.

**शरद पाटील :-**

मग त्यांचे खाली झालेले डब्बे परत इथे आणुन जमा करतात का? आपल्याला कसं माहित पडेल ते खाली झालं की, चोरीला गेलं काय झालं?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डब्बे आहेत ना.

**शरद पाटील :-**

परत आणतात ना. एका ठिकाणी येतात ना सगळे आले तर आम्हाला बोलवा आम्हाला पण चेक करायचं आहे बघायचे आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जैन साहेबांना दाखवले आहेत विक्रम कुमार साहेबांना पण दाखवले होते. औषध नसलं रिकामा डब्बा झाला तर कोणी फेकुन पण टाकत असेल. डब्बे कुठे गेले हे कुठे गेलं एवढे अभिप्रेत माहिती नाही.

**शरद पाटील :-**

रिकामे डब्बे झालेले तुम्ही ठेवायला सांगा साहेब ते जमा करायला सांगा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

विक्रम कुमार साहब ने रेड मारा था और उन्होंने ऑर्डर दिया था की, जितने डब्बे आपने बाटे है, उतने डब्बे वापस लाओ। उतने डब्बे वापस आ नही पाये थे। और डिपार्टमेंट मे बहोत हडकम मचा था और वह मॅटर एकबार आपको वॉर्निंग देके छोड दिया गया था। आपको मतलब डिपार्टमेंट को उसके बाद स्टँडींग............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

फक्त २०-२५ डब्बे नव्हते ते कोणी वापरायला घेऊन गेले नाही उसका बॅच नंबर रहता है। औषध कितना है आपको मैने बताया था।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

लास्ट टाईम मे इसीपर परमिशन लिया था तब भी मैने बोला था आज फिर बोलता हूँ यह बहोत महंगे आते है, इनकी युथ पे मच्छर डिपेंड करते है मरते है की नही कैसे युज होता है और आपकी रिक्वायरमेंट जनरेट कैसी होती है वह भी मालुम नही अभितक आपलोग ऑर्डर निकालते है अभितक तो मैने लास्ट टाईम बताया था की, एसआय ने मुकादम को कितना दिया उसने कहाँ कहाँ कितना युज किया उसके एन्ट्री का रजिस्टर बनता है। उसकी सबको बुलाके एक क्वॉटीटी नोट को जाए। कितना युज हुआ? उसे हमे नेक्स्ट टाईम का जनरेशन मालुम पडेगा। रिक्वायरमेंट जनरेशन कितना है? दुसरी बात यह डब्बे है एक एक डब्बा ४०-४० हजार का आता है। यह आवश्यक रुप से जैसे डब्बा खाली हुआ वह बॅच नंबर नोट करके, बॅच नंबर खाली करके एकबार स्थायी समिती के सामने अवलोकन के लिए डब्बे लेके जाए। यह डब्बे पुरे युज हो गये है ताकी नये डब्बे के अंदर पुराना डब्बा मिक्स करने का कान नही हो सके। यह मे बार बार बोल चुका है। इसलिए टेंडर मे जो दवा के डब्बे मंगाये है। वह सब डब्बे इकट्ठे करके एक डेट नक्की की जाये स्थायी समिती वहाँ उन सब डब्बो को एकसाथ देखना चाहेगी।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ठिक है देखो।

**मा. सभापती :-**

सर्व अवलोकन मंजुर करण्यात येत आहेत.

**प्रकरण क्र. १२८ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. ११७ :-**

मनपा. क्षेत्रातील डास नियंत्रण करणे कामी खरेदी करण्यात आलेल्या अळी नाशक, किटक नाशक, डास अळी नाशक आदी खालील कामाच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो., यांच्या मंजुरी दिली आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | कामाचा तपशिल | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. रमेश ॲग्रोकेम कार्पोरेशन | ई-टेंडरींग पध्दतीने Pyrosene Oil - E व Temphos 50% EC पुरवठा | रु. १९,८०,०००/- |
| २ | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | ई-टेंडरींग पध्दतीने Bifenthrin 10% WP पुरवठा | रु. ९,६२,५००/- |
| ३ | मे. बायर क्रॉप्स सायन्स लि. | थेट पध्दतीने बायटेक्स १००० व के-ओथ्रीन फ्लो पुरवठा | रु. १९,९५,२५०/- |
| ४ | मे. ए. साज ॲग्रीकेअर प्रा. लि. | थेट पध्दतीने Larcon 1% Granules (Temephos 1% S.G) पुरवठा | रु. ५,००,०००/- |

उपरोक्त अ.क्र. ०१ ते ०४ या कामांचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १२९ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) १) लेखनसामुग्री (स्टेशनरी) खरेदी करणे, २) विविध प्रकारची नमुने छपाई करणे व ३) बोर्ड बॅनर बनविणे व पुरवठा करणे.

**ठराव क्र. ११८ :-**

**विषय :- १ लेखनसामुग्री (स्टेशनरी) खरेदी करणे.**

महानगरपालिकेने दि. ०३/०८/२०१३ रोजी "दै.लोकसत्ता व दै. आफ्टरनून" या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर फेर निविदा सुचनेनुसार On-line Re-Tendering व्दारे महानगरपालिकेस लेखनसामुग्री (स्टेशनरी) खरेदी करणेकामी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर कामी ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी पात्र

निविदाधारक मे. ए.डी. इंटरप्रायजेस, मे. प्रेयस कार्पोरेशन, मे. एस. व्ही. इंटरप्रायजेस यांनी सादर केलेल्या निविदेतील कमी दरास मा. आयुक्त सो. यांनी दि. ०५/१०/२०१३ रोजी वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी दिलेली आहे.

महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार लागणारी स्टेशनरी खरेदी करण्याकामी अंदाजित रु. २०.०० लाख मर्यादेत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**विषय :- २ विविध प्रकारची नमुने छपाई करणे.**

महानगरपालिकेने दि. १७/०८/२०१३ रोजी "दै. खबरे आजतक" या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर फेर निविदा सुचनेनुसार On-line Re-Tendering व्दारे महानगरपालिकेस विविध प्रकारची नमुने छपाई करणेकामी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर कामी ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी पात्र निविदाधारक मे. वसंत ट्रेडर्स, मे. प्रेयस कार्पोरेशन, मे. गणेश प्रिंटर्स यांनी सादर केलेल्या निविदेतील कमी दरास मा. आयुक्त सो. यांनी दि. ०५/१०/२०१३ रोजी वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी दिलेली आहे.

महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार लागणारी विविध प्रकारची नमुने छपाई करण्याकामी अंदाजित रु. १५.०० लाख मर्यादेत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**विषय :- ३ बोर्ड बॅनर बनविणे व पुरवठा करणे.**

महानगरपालिकेने दि. ०१/१०/२०१३ रोजी "दै. नवाकाळ" या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर फेर निविदा सुचनेनुसार On-line Re-Tendering व्दारे महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार बोर्ड बॅनर बनविणे व पुरवठा करणेकामी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर निविदेस तीन वेळा मुदतवाढ देऊनही निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने प्राप्त झालेल्या दोन निविदेची Financial Bid उघडणेकामी मंजुरी घेतलेली होती. त्यापैकी पात्र निविदाधारक मे. ए.डी. इंटरप्रायजेस व मे. एम.एस. इंटरप्रायजेस यांनी सादर केलेल्या निविदेतील कमी दरास मा. आयुक्त सो. यांनी दि. ०५/१०/२०१३ रोजी वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी दिलेली आहे.

महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार लागणारी बोर्ड बॅनर बनविणे व पुरवठा करण्याकामी अंदाजित रु. १०.०० लाख मर्यादेत खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये सदर प्रकरणाचे अवलोकन करण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १३० :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (वैद्यकिय विभाग)

**ठराव क्र. ११९ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार वैदयकीय विभागाकरीता आवश्यक औषधे, सर्जिकल मटेरीअल, लॅब मटेरीअल पुरवठा करणेकरिता मागविलेल्या निविदेतील मे. जेनोवा बायोटेक, मे. एस. आर. एन्टरप्राईजेस, मे. सरीता डिस्ट्रीब्युटर्स या निविदाकारांनी सादर केलेल्या कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. १.१५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**